मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : ११९ ■ मंगळवार, ०६ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# प्रभाग १२ मधून प्रभाकर शाबा कांबळे यांची दमदार एन्ट्री

## “राजकारण १०%, समाजकार्य ९०%” — विकासाचा ठोस अजेंडा जाहीर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल | प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रभाग क्रमांक १२ मधून सुप्रसिद्ध समाजसेवक प्रभाकर शाबा कांबळे यांनी नगरसेवक पदासाठी उमेदवारी जाहीर करताच राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून प्रभागातील नागरी प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणारे प्रभाकर कांबळे आता थेट लोकप्रतिनिधी म्हणून जबाबदारी स्वीकारण्यासाठी मैदानात उतरले आहेत.

उमेदवारी जाहीर करताना त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, मतदारांनी संधी दिल्यास प्रभाग क्रमांक १२ मधील वर्षानुवर्षे रखडलेले प्रश्न निकाली काढण्यासाठी ते कोणतीही तडजोड न करता काम करतील. केवळ घोषणा नव्हे तर प्रत्यक्ष कृती हा त्यांचा मंत्र असल्याचे त्यांनी ठासून सांगितले.

**सामाजिक कार्यातून उभे राहिलेले नेतृत्व**

प्रभाकर शाबा कांबळे हे राजकारणातून नव्हे, तर समाजकारणातून घडलेले नेतृत्व म्हणून ओळखले जातात. पाणीटंचाई, खराब रस्ते, महिलांचे प्रश्न, युवकांचे रोजगार, प्रशासनातील दिरंगाई—अशा अनेक विषयांवर त्यांनी रस्त्यावर उतरून तसेच प्रशासनाशी संघर्ष करून प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आहे.

“राजकारण १० टक्के, समाजकार्य ९० टक्के” हा त्यांचा विचार केवळ घोषणापुरता मर्यादित न राहता त्यांच्या कामातून सातत्याने दिसून आला आहे. त्यामुळेच आज सामान्य नागरिक त्यांच्याकडे काम करणारा उमेदवार म्हणून पाहत आहेत.

**पाणीप्रश्नावर थेट हल्लाबोल**

प्रभाग क्रमांक १२ मधील सर्वात ज्वलंत प्रश्न म्हणजे अनियमित व अपुरा पाणीपुरवठा. अनेक भागांत दिवसाआड पाणी, कमी दाब, तर काही ठिकाणी टँकरवर अवलंबून राहावे लागते.

यावर बोलताना प्रभाकर कांबळे म्हणाले,

**“पाणी हा अधिकार आहे, दया नाही.”**

निवडून आल्यास नवीन पाइपलाइन, जुन्या लाईनची तात्काळ दुरुस्ती, जलसाठा वाढ आणि महानगरपालिकेकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा करून पाणीप्रश्न कायमचा मिटवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.






**खड्डेमुक्त रस्त्यांचा स्पष्ट रोडमॅप**

प्रभागातील रस्त्यांची अवस्था अनेक वर्षांपासून नागरिकांच्या रोषाचा विषय ठरली आहे. पावसाळ्यात चिखल, उन्हाळ्यात धूळ आणि वर्षभर खड्डे—हीच ओळख झाली आहे.

प्रभाकर कांबळे यांनी स्पष्ट केले की,

- मुख्य रस्त्यांचे दर्जेदार डांबरीकरण
- अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण
- ड्रेनेज व रस्ते कामांमध्ये समन्वय
- वाहतुकीसाठी नवीन रस्त्यांची निर्मिती

या कामांना ते प्राधान्य देतील. “रस्ते म्हणजे विकासाची नाडी आहे,” असे त्यांनी ठामपणे सांगितले.

**महिलांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य**

महिलांवरील वाढते अत्याचार आणि असुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर प्रभाकर कांबळे यांनी महिलांसाठी ठोस उपाययोजना जाहीर केल्या आहेत. संवेदनशील भागांत CCTV कॅमेरे, महिलांसाठी तात्काळ सहाय्य कक्ष, आरोग्य शिबिरे आणि स्वावलंबन प्रशिक्षण या माध्यमातून महिला सुरक्षिततेचा मजबूत ढाचा उभा करण्याचा त्यांचा मानस आहे.

“महिला सुरक्षित नसतील, तर विकास अपूर्ण आहे,” असे ते म्हणाले.

**युवकांसाठी संधींचे दालन**

प्रभागातील बेरोजगार युवकांसाठी केवळ आश्वासने नव्हे तर प्रत्यक्ष संधी निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. रोजगार मार्गदर्शन शिबिरे, कौशल्य विकास, स्थानिक उद्योगांशी समन्वय तसेच क्रीडा मैदान व साहित्य उपलब्ध करून युवकांना सकारात्मक दिशेने वळवण्याचे नियोजन त्यांनी जाहीर केले.

**‘प्रभाग १२ माझा परिवार’ — भावनिक साद**

उमेदवारी जाहीर करताना प्रभाकर कांबळे भावुक होत म्हणाले,

“प्रभाग क्रमांक १२ हा माझा परिवार आहे. इथल्या प्रत्येक घरातील अडचण माझी आहे. मला संधी दिल्यास पाणी, रस्ते, महिला सुरक्षितता आणि युवक विकास या चारही आघाड्यांवर मी कुठलीही तडजोड न करता काम करेन. प्रभागाचा विकासाचा दर्जा उंचावून तो आदर्श बनवणे हेच माझे ध्येय आहे.”

**मतदारांसाठी थेट आवाहन**

प्रभाग १२ मधील मतदारांना उद्देशून त्यांनी स्पष्ट संदेश दिला आहे—

**“आपला एक मत…**

आपल्या प्रभागाच्या भविष्यासाठी निर्णायक ठरणार आहे.”कामाचा अनुभव, सामाजिक बांधिलकी आणि ठोस विकास अजेंडा यामुळे प्रभाकर शाबा कांबळे यांची उमेदवारी प्रभाग १२ मध्ये विशेष लक्ष वेधून घेत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

# पत्रकार मित्र असोसिएशनच्या ठाणे महिला शहराध्यक्षापदी समाजसेविका गौरी धबडे यांची नियुक्ती

## ठाणे शहरामध्ये असोसिएशनच्या माध्यमातून महिलांसाठी सक्रिय राहणार : समाजसेविका गौरी धबडे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** पत्रकार मित्र असोसिएशनची याआधी असलेली कार्यकारणी गेल्यावर्षी बरखास्त करण्यात आली होती त्यानंतर संस्थेचे संस्थापक केवल महाडिक यांच्या मागदर्शनानुसार आयोजित बैठकीत विविध पदे नियुक्त केली होती. नुकतीच ठाणे जिल्ह्यातील



कार्यरत समाजसेविका गौरी धबडे यांची ठाणे शहर महिलाध्यक्षापदी करण्यात आली असून पत्रकार मित्र असोसिएशनच्या माध्यमातून अनेक लोकउपयोगी कामे करण्यासाठी त्या नेहमी प्रयत जाणार असून विशेषतः महिलांसाठी रोजगार, व्यवसाय यासारख्या प्रमुख बाबींना प्राधान्य देणार असून महिलांसाठी नेहमी सक्रिय राहणार असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. याबाबतचे नियुक्तीपत्र त्यांना देण्यात आले आहे. तसेच संघटनावाढीसाठी मी संपूर्ण ठाणे जिल्ह्यात महिलांची बांधणी करणार असून असोसिएशनच्या सर्वच कार्यात माझा सक्रिय सहभाग असेल असेहि त्यांनी सांगितले.

# ६ जानेवारी दर्पण दिना निमित्त आयोजित कार्यक्रमास पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे

## पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथ कोल्हे यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा तालुका पत्रकार संघाच्या वतीने दिनांक ६ जानेवारी रोजी मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती निमित्त तसेच त्यांनी स्थापन केलेल्या दर्पण या वृत्तपत्राच्या स्मरणार्थ दर्पण दिन साजरा करण्यात येणार आहे. या निमित्ताने पाटोदा तालुका पत्रकार संघाचे संस्थापक/ अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे यांच्या



निवासस्थानी दुपारी ०१:०० वाजता आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. प्रति वर्षीप्रमाणे यंदा ही दर्पण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असून, हा कार्यक्रम पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास पाटोदा तालुक्यातील सर्व पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पाटोदा तालुका पत्रकार संघाच्या वतीने अध्यक्ष सोमीनाथ कोल्हे यांनी केले आहे.

# नेत्रा पाटील व किरण पाटील दाम्पत्याच्या बंडखोरीला सुज्ञ मतदारांनी बळी पडू नये - जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत खारघर परिसरात भारतीय जनता पार्टी महायुतीच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात नेत्रा किरण पाटील व त्यांचे पती किरण पाटील यांनी स्वतःच्या वैयक्तिक स्वार्थासाठी उमेदवारी अर्ज दाखल करून उघड बंडखोरी केली आहे. त्यामुळे त्यांच्या कोणत्याही भूलथापा, अफवांना बळी न पडता प्रभागाच्या सर्वांगीण आणि सातत्यपूर्ण विकासासाठी सुज्ञ मतदारांनी भाजप महायुतीच्याच अधिकृत उमेदवारांना मतदान करावे, असे ठाम आवाहन भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी केले आहे.

सन २०१७ मध्ये झालेल्या पनवेल महानगरपालिकेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपने विश्वास दाखवत नेत्रा पाटील यांना उमेदवारीची संधी दिली होती आणि त्या नगरसेवक म्हणून निवडून आल्या होत्या. मात्र यावेळी पक्षाने उमेदवारी न दिल्यामुळे नाराज होत पाटील दाम्पत्याने पक्षशिस्त झुगारून देत भाजपकडे राजीनामा सादर केला आणि स्वतंत्रपणे उमेदवारी अर्ज दाखल केला.

गेल्या आठ वर्षांच्या कालावधीत भाजपच्या माध्यमातून आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली खारघर प्रभागात मोठ्या प्रमाणावर विकासकामे, पायाभूत सुविधा, सामाजिक उपक्रम आणि नागरिकाभिमुख योजना राबवण्यात आल्या. या संपूर्ण कालावधीत पक्ष संघटनेने नेत्रा पाटील व किरण पाटील यांना संघटनात्मक बळ, सहकार्य आणि व्यासपीठ उपलब्ध करून दिले. मात्र या सर्व योगदानाचा सोयीस्कर विसर पाडत पाटील दाम्पत्याने केवळ स्वतःच्या राजकीय महत्त्वाकांक्षेसाठी भाजप महायुतीच्या अधिकृत उमेदवारांविरोधात निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे. यानंतर त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला असून, त्यामुळे नेत्रा पाटील आणि किरण पाटील यांचा आता भाजपशी कोणताही संबंध उरलेला नाही. त्यामुळे भाजप महायुतीचे कार्यकर्ते, पदाधिकारी, हितचिंतक तसेच सामान्य नागरिकांनी या दाम्पत्याला कोणत्याही प्रकारचे सहकार्य करू नये, असे आवाहनही जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी केले आहे.खारघर आणि पनवेल शहराचा नियोजित, पारदर्शक आणि विकासाभिमुख कारभार केवळ भाजप महायुतीच देऊ शकते. त्यामुळे मतदारांनी कोणत्याही वैयक्तिक स्वार्थाला किंवा बंडखोरीला थारा न देता भाजप महायुतीच्या अधिकृत उमेदवारांनाच भरघोस मतांनी विजयी करावे, असे आवाहन अविनाश कोळी यांनी शेवटी केले आहे.

# पत्रकार चषक क्रिकेट स्पर्धेत पनवेल तालुका पत्रकार संघ विजयी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल तालुक्यातील भाताण येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ आयोजित वेध विकासाचा पत्रकार चषक 2026 या स्पर्धेत पत्रकारांच्या झालेल्या सामन्यात पनवेल तालुका पत्रकार संघाने बाजी मारली आणि विजयश्री खेचून आणली.

रविवार 4 जानेवारी रोजी भाताण येथे पत्रकार सुनिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली पत्रकार चषकाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कर्जत खालापूर पत्रकार संघ आणि पनवेल तालुका पत्रकार संघ यांच्यात दोन षटकांचा सामना खेळवण्यात आला. यावेळी खालापूर तालुका पत्रकार संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. यावेळी पहिले षटक घेऊन आलेल्या गोलंदाज रत्नाकर पाटील यांच्या फिरकी गोलंदाजीवर फटका मारत असताना क्षेत्ररक्षक अनिल कुरघोडे यांच्या हातात झेल देऊन खालापूर तालुका पत्रकार संघाचा पहिला खेळाडू





बाद झाला. यावेळी खालापूर तालुका पत्रकार संघाने दोन षटकांमध्ये 16 धावा फटकावल्या आणि पनवेल तालुका पत्रकार संघापुढे 17 धावांचे आव्हान ठेवले. प्रत्युत्तरादाखल मयुर तांबडे यांच्या नेतृत्वाखाली पनवेल तालुका पत्रकार संघाकडून एकही विकेट न पाडता प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या रत्नाकर पाटील आणि प्रमोद चौलकर या जोडीने दोन चेंडू राखून 17 धावा केल्या आणि कर्जत तालुका खालापूर संघावर मात केली. या सामन्याचा मानकरी प्रमोद चौलकर ठरले, त्यांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली. विजयानंतर पनवेल तालुका पत्रकार संघाचे कर्णधार मयूर तांबडे, रत्नाकर पाटील, प्रमोद चौलकर, सुभाष वाघपंजे, अनिल कुरघोडे, आसिम शेख, सुनील पाटील, सुनील वारगडा यांनी जल्लोष करत आनंद व्यक्त केला. उत्कृष्ट कामगिरीबद्दल पनवेल तालुका पत्रकार संघाला मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले, यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेना पनवेल तालुका अध्यक्ष रामदास पाटील, ॲड.संतोष खांडेकर, माजी उपसभापती वसंत काठवले, खानावळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच मोहन लबडे, भाजप कामगार प्रदेश अध्यक्ष अनंताबुवा पाटील, भाजप विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, शिवसेना नेते शिवाजी माळी, माजी सरपंच अनिल पाटील, सामाजिक कार्यकर्ते नितीन पाटील, माजी उपसरपंच सुभाष लाखांबले, माजी उपसरपंच महादेव पाटील, भाताण ग्रामपंचायतीचे सरपंच तानाजी पाटील, माजी उपसरपंच अरुण पाटील, ग्रामपंचायत सदस्य अनिल काठवले, कसळखंड ग्रामपंचायतीचे सरपंच संजय घरत यांच्यासह पनवेल, कर्जत, खालापूर येथील पत्रकार मोठया संख्येने उपस्थित होते.

# प्रभाग १७ अ चे उमेदवार शंकर वायदंडे यांचा प्रचाराचा जोरदार सुरवात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक प्रभाग क्रमांक 17 चे वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार शंकर मारुती वायदंडे यांच्या प्रचाराची सुरवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून रविवार दि ०४ जानेवारी रोज तथागत भगवान गौतम बुद्ध डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करून सर्व महापुरुषाचा वंदना व जयघोष करून करण्यात आला प्रचाराचा नारळ वंचित बहुजन आघाडी महानगर अध्यक्ष आनंद गायकवाड महासचिव अविनाश अडगळे महासचिव संतोष मुजमुले यांच्या शुभहस्ते करण्यात आला यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त महिलांसाठी हळदी कुंकूव खेळ पैठणीचा कार्यक्रम ठेवण्यात आला अनेक महिलांनी या खेळाचा आनंद घेऊन पैठणी जिंकल्या यावेळी पत्रकार शंकर वायदंडे यांनी प्रभाग क्रमांक 17 चा विकास करण्याचे वचन दिले असून प्रभाग क्रमांक 17 मधील सर्वच प्रश्न सोडवण्याचे कटीबद्ध असल्याचे बोलत प्रभागातील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करून प्रभाग झोपडपट्टी मुक्त करणार असल्याचे सांगितले झोपडपट्याचे पुनर्वसन व्हावे ही प्रस्थापित नगरसेवकांची व पक्षांची मानसिकता नसल्यामुळे पनवेल मधील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन रखडले असून यासाठी मी प्रशासन दरबारी सर्व ठिकाणी पाठपुरावा करत असून जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी मला जनतेने उभे केले असून जनतेचा आवाज पालिकेच्या सभागृह द्यावे आता पर्यंत प्रस्थापित पक्षांनी प्रभाग १७ साठी अनुसूचित जातीचे सर्व उमेदवार नगरसेवक आयात केले आहेत आता स्थानिक नगरसेवक पदाचे उमेदवार प्रभागातील पंचशीलनगर झोपडपट्टी मधून तळून तडफदार रायगड सम्राट न्यूज चे संपादक शंकर वायदंडे यांचे कडवे आव्हान असून शंकर वायदंडे यांच्या उमेदवारीने प्रभाग 17 मधील सर्व मतदारांकडून मोठा प्रतिसाद







मिळत असून सर्व स्तरातून त्यांना मोठा पाठिंबा देण्यात येत आहे मागील कार्यकाळातील नगरसेवक प्रकाश बिनेदार व यांचे सोबती कधीच प्रभागात फिरले नसून त्यांनी प्रभागासाठी कोणतेच काम केले नाही त्याचबरोबर मूलभूत सुविधा पाणी सुद्धा पोचवण्यास असमर्थक राहिले प्रभागात नियोजन शून्य कामगिरी व अवाजवी मालमत्ता करामुळे सर्व नागरिक त्रस्त झाले असून प्रचंड प्रमाणात प्रस्थापित नगरसेवकांवरती नाराजी असल्याने नेहमी जनतेचे प्रश्न मांडणारे पत्रकार शंकर मारुती वायदंडे यांना मतदान करण्यासाठी सर्व मतदारांचे मतदारांचा कल आहे

यावेळेस स्थानिक समाजसेवक राहुल पोपलवार यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की कुत्र्या मांजरा गाढवापेक्षा आपली किंमत कमी लावून आपले लोकशाही धोक्यात आणण्याचे धनाडे नगरसेवक काम करत असून दोनशे पाचशे रुपयासाठी पाच वर्षासाठी स्वतःला विकू नका डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी घटने मधून आपल्याला मतदान करण्याचा अधिकार दिलेला आहे योग्य उमेदवार शंकर मारुती वायदंडे यांच्या पाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नातू श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकरांचा आशीर्वाद असून त्यांची ताकद पूर्णपणे शंकर वायदंडे यांच्या पाठीशी असून कोणाला घाबरण्याची गरज नाही यापुढे प्रभागाचा विकास आमच्या हक्काचा माणूस शंकर वायदंडेच करणार अशी ग्वाही दिली

तसेच यावेळी वंचित बहुजन आघाडीचे पनवेल महानगरपालिका क्षेत्र अध्यक्ष आनंद गायकवाड यांनी प्रचारादरम्यान सांगितले की बहुजनांच्या विकासासाठी श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांनी पनवेल प्रभाग १७ चे उमेदवार शंकर मारुती वायदंडे पत्रकार असून समाजाची प्रश्नाचे जाणता व्यक्तिमत्व असून त्यांनी आतापर्यंत सर्व स्तरातील लोकांचे प्रश्न आपल्या पत्रकार्तित मांडले असल्याने जनतेचा आवाज सभागृहात मांडण्यासाठी वंचित बहुजन पक्षाचा वतीने आम्ही उमेदवारी दिली असून नक्कीच आमचा विश्वास आहे की शंकर मारुती वायदंडे हे पनवेल महानगरपालिकेत प्रभाग 17 चा आवाज उठवत विकास कामे करतील आणि पनवेल मधील त्यांनी घेतलेले जनसामान्याचे व महिला भगिनींचे सर्वच प्रश्न सोडवण्याचे काम करतील असा आम्हाला विश्वास आहे त्यामुळे सर्व जनतेने शंकर वायदंडे क्रमांक चार चे निशाणी गॅस सिलेंडर समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने शंकर वायदंडे यांना विजयी करावे

या दरम्यान संतोष मुजमुले अविनाश आडागळे यांनी शंकर वायदंडे यांचे कौतुक करत मतदान करण्याचे आव्हान केले स्थानिक रहिवाशी प्रमोद कोळी पूनम कुंडलिक माघाडे यांनी आतापर्यंत आम्हाला नेतृत्व मिळाले नव्हते आत्ता शंकर दादाच्या रूपाने नेतृत्व मिळाले असून कार्य शून्य नगरसेवकांसमोर मोठे आव्हान उभे केले असून सर्व जनता शंकर वायदंडे यांच्या पाठीशी असून येत्या काळात आम्ही सर्व महिला व नागरिक जनतेला मध्ये प्रचार करून शंकर वायदंडे यांना विजयी करण्यासाठी सर्व जनतेच्या वतीने कायम सोबत असल्याचे सांगितले.

एकंदरीत प्रस्थापित नगरसेवकांचा नाकर्तेपणा कॉलनीमध्ये कोणत्याही स्वरूपाचे काम न केल्याने तसेच झोपडपट्ट्यांच्या प्रश्न न मांडल्याने पनवेल मधील जनता वंचित बहुजन आघाडीच्या शंकर मारुती वायदंडे यांच्या पाठीशी असल्याचे दिसत असून या निवडणुकीत विजय नक्कीच शंकर वायदंडे यांचा होणार असल्याचे नागरिकांनी सांगितले

## डॉ. दीपक संग्राम सोमवंशी निडेबन जि.प. गटातून निवडणूक लढविणार

**दैनिक युवक आधार**

**लातूर. जिल्हा प्रतिनिधी : सोमवंशी जोगेंद्र :** नुकत्याच होऊ घातलेल्या स्थानीक स्वराज्य संस्था निवडणुकीतील प्रक्रिया चालू असून आगामी काळात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका होणार असल्याने अनेकजण जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक लढवण्याच्या तयारीला लागले आहेत. शहरालगत असलेला निडेबन हा जिल्हा परिषद गट अनुसूचित जाती ( पुरुष ) साठी राखीव असल्याने निडेबनचे भूमिपुत्र, उदगीर येथील सुप्रसिद्ध डॉ. दीपक सोमवंशी ही निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने तयारीला लागले आहेत. ते निडेबनचे भूमिपुत्र असल्याने त्यांना ही निवडणूक जिंकणे सुलभ होईल असे लोकांतून बोलल्या जात आहे. विशेष म्हणजे स्थानिक लोकांच्या आग्रहास्तव ते या निवडणूक



रिंगणात उतरणार आहेत.

डॉ. दीपक सोमवंशी यांचा जन्म निडेबन येथे सामान्य कुटुंबात झाला.अतिशय हालाखीच्या परिस्थितीत त्यांनी वैद्यकीय शिक्षण घेतले. त्यानंतर अनेक ठिकाणी वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा बजावली. परंतु आपण ज्या परिसरात वाढलो, घडलो त्या परिसरातील लोकांची सेवा करता यावी या उदात्त हेतूने त्यांनी 2009 मध्ये उदगीर येथे महात्मा बसवेश्वर चॅरिटेबल हॉस्पिटलची सुरुवात केली, या माध्यमातून त्यांनी लोकांची सेवा करू लागले. अल्पवधीतच लौकिकास आलेल्या डॉ. सोमवंशी यांनी माफक दरात रुग्णसेवा सुरु केली. शिवाय उदगीर परिसरातील अनेकांना मदतीचा हात दिला. निडेबन या गावात सर्वांच्या सुखदुःखात ते सहभागी होत असतात. वैद्यकीय सेवेशिवाय त्यांनी सामाजिक कार्यातही हिरीरीने सहभाग नोंदवला. कुठलेही सामाजिक कार्य असो त्यांच्याकडे कार्यासाठी येणाऱ्या अनेकांना त्यांनी सहकार्य करीत प्रोत्साहन दिले. अनेकांना शिक्षणासाठी आर्थिक मदत केली, अनेकांना व्यवसायासाठी मदत केली, अनेक तरुणांना रोजगार उपलब्ध करून दिला. सुशिक्षित बेरोजगारांना स्वावलंबी बनविणे यासाठी त्यांचा प्रयत्न असतो. माणसे जोडणे आणि ती जपने हे त्यांचे खास वैशिष्ट्ये. आपल्या वैद्यकीय सेवेतूनही ते अनेकांना वेळ उपलब्ध करून देतात. त्यामुळे अनेकजण त्यांच्याकडून मार्गदर्शन घेवून आपले कार्य करीत असतात. प्रत्येक क्षेत्रात आपली माणसे असावीत हा त्यांचा हेतू. त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाने अनेकजण वेगवेगळया क्षेत्रात स्थिरवलेले आहेत. आपल्या वैद्यकीय सेवेतून दररोज कार्यकर्त्यांना ते वेळ देत असतात. त्यांच्या वैद्यकीय, सामाजिक कार्याची पद्धत पाहून त्यांनी राजकारणात यावेत जेणेकरून अनेकांची कामे होतील या हेतूने लोकं त्यांना गेल्या अनेक वर्षांपासून राजकारणात येण्यासाठी आग्रह करीत होते. नुकतेच निडेबन जिल्हा परिषद गट अनुसूचित जातीसाठी राखीव सुटल्याने कार्यकर्ते त्यांना ही निवडणूक लढवण्यासाठी आग्रह करीत असून यावेळी त्यांनी ही निवडणूक लढविण्याच्या दृष्टीने पाऊल उचलले असून ग्रामीण भागातून त्यांना लोकांचा निवडणूक लढविण्यासाठी प्रतिसाद मिळत आहे.

## शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, एरंडोलला ९४.३ माय एफएमचा 'व्हिजनरी ऑफ द इयर' पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी एरंडोल :** समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यासाठी ९४.३ माय एफएमतर्फे दरवर्षी दिला जाणारा प्रतिष्ठेचा *व्हिजनरी ऑफ द इयर* पुरस्कार यंदा शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, एरंडोल यांना प्रदान करण्यात आला. हा सन्मान जळगावचे पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी (आयपीएस) यांच्या शुभहस्ते संस्थेचे संस्थापक डॉ. विजय शास्त्री व सौ. रूपा शास्त्री यांना प्रदान करण्यात आला.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अल्पावधीत केलेले उल्लेखनीय शैक्षणिक कार्य, तसेच शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात दीर्घकाळ सातत्याने केलेले योगदान आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाची दखल घेत ९४.३ माय एफएमतर्फे हा सन्मान प्रदान करण्यात आला.

डॉ. विजय शास्त्री व सौ. रूपा शास्त्री यांनी विविध उपक्रमांच्या




माध्यमातून समाजातील विविध घटकांपर्यंत सकारात्मक विचार, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि सांस्कृतिक जाणीव पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या शैक्षणिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना नवी दिशा मिळाली असून सामाजिक बांधिलकी जपत समाजोपयोगी कार्याचा आदर्श निर्माण झाला आहे.

सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी सातत्याने योगदान देत कला, साहित्य व संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी भरीव कार्य केले आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यास शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर नागरिक, शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर तसेच ९४.३ माय एफएमचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुरस्कार स्वीकारताना डॉ. विजय शास्त्री व सौ. रूपा शास्त्री यांनी हा सन्मान वैयक्तिक नसून समाजासाठी केलेल्या सामूहिक प्रयत्नांची पावती असल्याचे सांगितले. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून दर्जेदार व मूल्याधिष्ठित उच्च शिक्षण देण्याचे अविरत कार्य शास्त्री इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीतर्फे सुरूच राहील, असे डॉ. विजय शास्त्री यांनी नमूद केले. या यशात योगदान देणाऱ्या सर्व सहकारी, मार्गदर्शक, शुभेच्छुक आणि कुटुंबीयांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले.या सन्मानाबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संस्थांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून जळगाव जिल्ह्यासाठी हा गौरवाचा व अभिमानाचा क्षण ठरला आहे.

## सावित्रीबाई ही एक विचारधारा आहे

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी रणजितसिंह ठाकुर :** उत्तमचंद बगडिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय रिसोड येथे विशाखा समिती, एन एस एस, सांस्कृतिक समिती च्यावतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कुलकर्णी होते. प्रमुख वक्त्या म्हणून ॲड. नूतन भराड ह्या होत्या. कार्यक्रमाचे नियोजन विशाखा समिती प्रमुख प्रा.डॉ. खेडेकर यांनी केले होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. खेडेकर यांनी सावित्रीबाई फुले यांचा संघर्ष विद्यार्थ्यांना सांगितला. ॲड. नूतन भराड यांनी सावित्रीबाई फुले यांचे काव्य, त्याचप्रमाणे सत्यशोधक समाजाचे कार्य, बालहत्या प्रतिबंधक गृह, स्त्रीशिक्षण, बहुजन समाजासाठी सावित्रीबाई व महात्मा फुले यांनी केलेले कार्य सविस्तर विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.




कुलकर्णी यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे कार्य म्हणजे बहुजन समाजाच्या मुक्तीचा नवा मार्ग होता. त्याचप्रमाणे त्यांच्या विचाराने आज अनेक स्त्रिया उच्च पदावर आहेत व त्यांचे जीवन सुखकर होण्यास सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळे शक्य झाले. एन एस एस प्रा.डॉ ए जी वानखेडे, प्रा . टिकार, प्रा.डॉ. बुधवंत, प्रा.डॉ. नंदेश्वर, प्रा.डॉ. मेश्राम प्रा.डॉ. नरवाडे सर यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले . सुत्रसंचालन डॉ. काळे मॅडम यांनी तर आभार प्रा बोंडे मॅडम यांनी केले . कार्यक्रमाला प्रा. पाठक मॅडम, प्रा. संदिप जुनघरे, प्रा.राम जुनघरे, प्रा. राऊत, प्रा बाजड, प्रा. साबळे, प्रा.सुमित लाव्हरे, प्रा वाघ, प्रा. पांढरे, श्री ओकार पूरी, गोपाल कोल्हे, संतोष घुगे, सुरज नरवाडे, व विद्यार्थी व विध्यार्थिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते . सोनाली अंभोरे गीत म्हटले त्यानंतर वैष्णवी घोडे, कैलास जाधव, मेघा इंगळे, पूजा मोरे, अभिषेक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्याचप्रमाणे सावित्रीबाई फुले एक विचारधारा या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. प्रथम क्रमांक वैशाली पाईकराव, द्वितीय क्रमांक हर्षदा देशमुख, तृतीय क्रमांक पूजा मोरे यांचा आला.

**ॲड.नूतन भराड**

## सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त ग्रामपंचायत पिपरटोला – तानू येथे भव्य महिला मेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/ प्रतिनिधी गोंदिया जिल्हा :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त ग्रामपंचायत पिपरटोला–तानू यांच्या वतीने शनिवार, दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी भव्य महिला मेळावा तसेच महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. महिलांच्या सर्वांगीण विकासाचा, सशक्तीकरणाचा आणि शिक्षणाचा संदेश देणारा हा कार्यक्रम ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागाने यशस्वीरीत्या पार पडला.या महिला मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी माननीय चित्रलेखा ताई चौधरी, सभापती पंचायत समिती गोरेगाव या होत्या. उपाध्यक्ष म्हणून माननीय सौ. शशिकलाताई ताराम, सदस्य पंचायत समिती गोरेगाव यांनी जबाबदारी सांभाळली. कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून माननीय सौ. भूमेश्वरी ताई रहांगडाले, अध्यक्ष महिला काँग्रेस पार्टी, तालुका गोरेगाव उपस्थित होत्या. सहउद्घाटक म्हणून माननीय वर्षाताई पटले, सरपंच ग्रामपंचायत निंबा यांनी उपस्थिती दर्शवली. दीपप्रज्वलन माननीय वैशालीताई कुसराम, सरपंच ग्रामपंचायत पिपरटोला–तानू यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माननीय भूमेश्वरी ताई औरासे (सरपंच, तेढा), माननीय सोनम ताई जगनित (माजी सरपंच), माननीय सौ. पूजाताई सुरेंद्र रहांगडाले, माननीय सौ. कोमलताई मेंढे, लक्ष्मीबाई हरिणखेडे, देवांगनाताई चव्हाण, सौ. विद्याताई डोये, सौ. सुरेखाताई डोये यांच्यासह दोन्ही गावांतील अंगणवाडी सेविका, मदतनीस, जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका, तसेच मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात स्त्री शिक्षणाची जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे विधीवत पूजन व अर्चना करून करण्यात आली. त्यानंतर स्वागतगीत व पुष्पगुच्छ देऊन सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माननीय वैशालीताई कुसराम यांनी केले. यानंतर माननीय लक्ष्मीबाई हरिणखेडे, माननीय पूजाताई सुरेंद्र रहांगडाले, माननीय भूमेश्वरी ताई रहांगडाले, माननीय वर्षाताई पटले, माननीय शशिकलाताई ताराम



यांनी आपल्या भाषणातून सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. स्त्री शिक्षणासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाची माहिती देत आजची स्त्री शिक्षणामुळे कशी सक्षम, स्वावलंबी आणि आत्मनिर्भर झाली आहे, याचे प्रत्यक्ष उदाहरणांसह मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात माननीय चित्रलेखा ताई चौधरी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याची सविस्तर माहिती दिली. प्रत्येक मुलीने शिक्षण घेतलेच पाहिजे, शिक्षणातूनच समाजपरिवर्तन शक्य आहे, असा मोलाचा संदेश त्यांनी महिला भगिनींना दिला. यानंतर महिलांसाठी आयोजित खो-खो स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. गावातील तीन खो-खो संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. सर्व संघांनी अत्यंत उत्साहाने व कौशल्यपूर्ण खेळ सादर केला. स्पर्धेतील विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते प्रथम पारितोषिक २००० रुपये, द्वितीय पारितोषिक १००० रुपये आणि तृतीय पारितोषिक १००० रुपये देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व ग्रामपंचायत पदाधिकारी, सर्व ग्रामस्थ, सुरेंद्र भाऊ रहांगडाले, माननीय ब्रिजलालजी कुसराम, माननीय कैलासजी कुसराम, ग्राम विस्तार अधिकारी सूर्यवंशी सर, तानुटोला शाळेचे मुख्याध्यापक नाकाडे सर, गौरीटोला शाळेचे मुख्याध्यापक कटरे सर, शाळेतील शिक्षकवृंद तसेच सर्व ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरकर मॅडम यांनी अत्यंत प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन कटरे मॅडम यांनी मानले. अशा प्रकारे ग्रामपंचायत पिपरटोला–तानू यांच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित महिला मेळावा व महिलांसाठीच्या विविध स्पर्धा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात आणि यशस्वीरीत्या पार पडल्या.

# माजी विद्यार्थ्यांचे प्रेम, स्वागताने माजी अध्यक्ष अँड बापूसाहेब नेने भारावून गेले

## वरसई हायस्कूलमध्ये सुवर्ण

**दैनिक युवक आधार**

**पेण/दीपक लोके :** शाळेच्या स्थापनेला ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित करण्यात आलेला सुवर्ण महोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे भव्य आयोजन, शिस्तबद्ध नियोजन आणि विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे, पेण एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष अँड बापूसाहेब नेने, रा, जि, प अध्यक्षा नीलिमा पाटील, पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने, भाजप महामंत्री वैकुंठ पाटील, दिलीप बापट, समीर साने, अँड नीता कदम, सुधीर जोशी, चिंचणीकर सर, भट सर, मुख्याध्यापक विनया पाटील, माजी मुख्याध्यापक एस के वाघमारे, शिक्षकवर्ग तसेच माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमस्थळी आकर्षक सजावट, सुवर्ण महोत्सवाची स्मृती जागवणारे छायाचित्र प्रदर्शन, तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.सुवर्ण महोत्सवाचे भव्य आयोजन पाहून संस्थेचे अध्यक्ष भारावून गेले. आपल्या मनोगतात त्यांनी शाळेच्या वाटचालीचा आढावा घेत या भागातील लोकांनी शाळा टिकून ठेवण्याचे मोठे योगदान आहे, आज




ही माजी विद्यार्थीचे उपस्थिती पाहून व या संस्थेवर असलेले प्रेम यातून आज स्पष्ट झाले पुढे बोलताना सांगितले की याभागत जूनियर कॉलेज कसे काढता येईल यासाठी प्रयत्न करणार तसेच माजी विद्यार्थ्यांचे यश आणि विद्यमान विद्यार्थ्यांची गुणवत्ता यांचे कौतुक केले. “ही शाळा केवळ शिक्षण देणारी संस्था नसून समाज घडविण्याचे कार्य करत आहे,” असे त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य, नाट्य व गीतांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. माजी मुख्याध्यापक व शिक्षक यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अक्षय पाटील, केतन पाटील, सुजता जाधव यांनी केले शेवटी उपस्थितांनी सुवर्ण महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आयोजक समितीचे अभिनंदन केले.

# “संकटात साथ देणारा, सुख-दुःखात उभा राहणारा आपला नेता!

## हॅप्पी सिंग यांची प्रभाग ११ मधून एन्ट्री; भाजपचा विश्वास, कामोठेकरांचं मनापासून पाठबळ”

**दैनिक युवक आधार**

**कामोठे (प्रतिनिधी):** कामोठे शहराच्या सामाजिक आणि राजकीय पटलावर गेल्या दोन दशकांपासून आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे लोकप्रिय नेतृत्व श्री. हॅप्पी सिंग यांनी भारतीय जनता पार्टीच्या वतीने प्रभाग क्रमांक ११ मधून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. "लोकांचे प्रेम हीच माझी शक्ती" मानणाऱ्या हॅप्पी सिंग यांच्या उमेदवारीमुळे या प्रभागात आता प्रचाराचा धडाका सुरू झाला आहे.

२१ वर्षांचे सातत्य आणि जनसंपर्क

गेल्या २० वर्षांहून अधिक काळ हॅप्पी सिंग हे कामोठेकरांच्या सुखादुखात सामील आहेत. केवळ निवडणूक आली की दर्शन देणारे नेते न राहता, त्यांनी



भव्य नवरात्रोत्सव, सामाजिक उपक्रम आणि युवा संवाद कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रत्येक घरात आपली ओळख निर्माण केली आहे. युवकांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांशी असलेले त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध हीच त्यांची जमेची बाजू मानली जात आहे.

लोकांसाठी रस्त्यावर उतरणारा नेता

हॅप्पी सिंग यांची ओळख एक लढाऊ कार्यकर्ता म्हणून आहे. कामोठेच्या भीषण पाणी प्रश्नासाठी त्यांनी सिडको प्रशासनाविरोधात दिलेला लढा ऐतिहासिक ठरला. जनतेच्या हक्कासाठी त्यांनी स्वतःवर पोलीस कारवाया झेलल्या, पण लोकांसाठी आवाज उठवणे कधीही थांबवले नाही.

**कोरोना काळातील 'देवदूत'**

संकटकाळात माणसाची खरी पारख होते. कोविड-१९ च्या काळात जेव्हा भीतीचे वातावरण होते, तेव्हा हॅप्पी सिंग रस्त्यावर उतरून सोसायट्यांचे सॅनिटायझेशन करत होते. यादरम्यान त्यांच्यावर गुन्हेही दाखल झाले, पण त्यांनी सेवेचा व्रत सोडला नाही. गुरुद्वाराच्या माध्यमातून हजारो गरजूंना मोफत अन्नपुरवठा करून त्यांनी हजारो कुटुंबांना आधार दिला.

**महिला सक्षमीकरण आणि युवा विकास**

केवळ राजकारण न करता सामाजिक बांधिलकी म्हणून हॅप्पी सिंग आणि त्यांच्या पत्नी सौ. हरजिंदर कौर यांनी महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. अनेक तरुणांना नोकरी आणि व्यवसायासाठी मार्गदर्शन करून त्यांना पायावर उभे करण्याचे काम या दांपत्याने सातत्याने केले आहे.

**राज्यस्तरीय अनुभवाचा फायदा**

आमदार प्रशांत दादा ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य म्हणून प्रभावी काम केले आहे. तसेच, तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील 'हिंद की चादर' या राज्यस्तरीय कार्यक्रमाच्या आयोजन समितीत त्यांना मिळालेली संधी ही त्यांच्या प्रशासकीय कौशल्याची ओळख करून देते. मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून शेकडो रुग्णांना आर्थिक मदत मिळवून देण्याचे पुण्यकर्म त्यांनी केले आहे.

**प्रचंड जनसमुदायाची उपस्थिती**

उमेदवारी अर्ज भरताना आज कामोठ्यात समर्थकांचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. भाजप कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य नागरिकांची मोठी उपस्थिती हे त्यांच्या लोकप्रियतेचे जिवंत उदाहरण ठरले. "प्रभागातील प्रत्येक समस्या सोडवणे आणि कामोठ्याचा सर्वांगीण विकास करणे हेच माझे ध्येय आहे," असा निर्धार यावेळी हॅप्पी सिंग यांनी व्यक्त केला.

# तळेरे पंचक्रोशी पत्रकार संघातील पदाधिकारी-पत्रकार जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**तळेरे- वार्ताहर :** पत्रकार दिनाच्या पार्श्वभूमीवर जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने पत्रकार कृतज्ञता दिन आयोजित करण्यात आला. यानिमित्त संस्थेच्यावतीने पत्रकारांना गौरविण्यात आले.

यावेळी जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, श्रावणी कम्प्युटर इन्स्टिट्यूटचे संचालक सतीश मदभावे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालयाच्या मास मिडिया विभागाचे प्रा. प्रशांत हटकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गुरुनाथ तिरपणकर यांनी संस्थेच्या पाच वर्षातील विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी बोलताना तिरपणकर



म्हणाले की, जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने दरवर्षी विविध भागातील पत्रकारांचा गौरव करण्यात येतो. आपल्या तळेरे पत्रकारांमध्ये असलेली एकजूट आणि परस्पर सहकार्य भावना लक्षात घेऊन पत्रकार दिनाच्या निमित्ताने पत्रकार कृतज्ञता सोहळा आयोजित करून संस्थेच्यावतीने गौरव करण्यात येत आहे. खरं. तर हा संस्थेच्या दृष्टिकोनातून महत्वाचा क्षण आहे.

यावेळी उपस्थित असलेल्या उदय दुधवडकर (दैनिक रत्नागिरी टाइम्स), संजय खानविलकर (दैनिक तरुण भारत), दत्तात्रय मारकड (दैनिक पुढारी), निकेत पावसकर (दैनिक लोकमत), महेश तेली (दैनिक नवराष्ट्र), अंकित घाडीगावकर (दैनिक सागर) यांना सन्मानपत्र आणि पेन देऊन गौरविण्यात आले.

**तळेरे येथे पत्रकार अभ्यासक्र**

यावेळी बोलताना प्रा. प्रशांत हटकर म्हणाले की, तळेरे येथील विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाचे "मास मिडिया" हा अभ्यासक्रम सुरू आहे. आणि यातून अनेक विद्यार्थी मुंबई सारख्या शहरात चांगल्या जॉब वर कार्यरत असून आपल्या जिल्ह्यातील तरुणांनी आणि सध्याचे तंत्रज्ञानांचे युग पाहता पत्रकारांनी हा अभ्यासक्रम जरूर करावा, असे आवाहन केले.

या कार्यक्रमात संस्थेच्यावतीने उदय दुधवडकर, सतीश मदभावे, प्रशांत हटकर यांना शाल, श्रीफळ व गुलाब फुल देऊन सत्कार करण्यात आला. तर तळेरे पंचक्रोशी पत्रकार संघाच्यावतीने शाल, श्रीफळ व गुलाब फुल देऊन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सतीश मदभावे, प्रशांत हटकर, उदय दुधवडकर, संजय खानविलकर, दत्तात्रय मारकड, महेश तेली, अंकित घाडीगावकर यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश मदभावे आणि निकेत पावसकर यांनी केले.त्याच प्रमाणे पत्रकार दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील संपादक, पत्रकार यांचा ऑनलाईन पद्धतीने सन्मानपत्र पाठवून त्यांचा जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

# सारा ही देवकन्या आहे : महेंद्रशेठ घरत

## लाईटस्टाईलचे उद्घाटन सारा तेंडुलकर यांच्या हस्ते

**दैनिक युवक आधार**

**उलवे, वार्ताहर :** "माझी आजी बालपणी मला काही तरी लहानसे सोन्याचे घ्यायची, तिच्या मुळेच मला लेटेस्ट दागिन्यांची आवड निर्माण झाली. त्यामुळे नवीन जनरेशनचा विचार करून पीएजीने तयार केलेल्या लेटेस्ट दागिन्यांची भुरळ नक्कीच तरुणाईला पडेल, त्यामुळे लाईटस्टाईलचे उद्घाटन करताना आनंद होत आहे, असे सारा तेंडुलकर खारघर येथे म्हणाल्या. त्यांच्या हस्ते दागिन्यांच्या शोरूमचे उद्घाटन झाले. यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे उपस्थित होते.

यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले,"सचिन तेंडुलकर यांनी क्रिकेटला वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले. क्रिकेट विश्वात अजरामर राहील अशी कारकीर्द केली. सचिन तेंडुलकर हे क्रिकेटचे देव आहेत. त्यामुळे सारा तेंडुलकर ही देव कन्या आहे."

यावेळी महेंद्रशेठ घरत यांनी सारा तेंडुलकर यांच्याशी संवाद साधला. तेव्हा आपण नवीन वर्षाच्या शुभमुहूर्तावर आजोबा झाल्याचे महेंद्रशेठ घरत यांनी 'गुड न्यूज' सारा तेंडुलकर यांना दिली. त्यानंतर चक्क सारा तेंडुलकर यांनी महेंद्रशेठ घरत



यांच्या नातीसाठी नाजूक आणि आकर्षक दागिना पसंत केला. तो महेंद्रशेठ घरत यांनी ताबडतोब खरेदी केला.

यावेळी प्रीतम म्हात्रे म्हणाले, "सारा पनवेल नगरीत पहिल्यांदा आली आहे. पीएनजी ज्वेलर्स हा मराठी उद्योजकांचा ब्रॅण्ड आहे. आम्हाला यांचा सार्थ अभिमान आहे."

यावेळी पीएनजी ज्वेलर्सचे सौरभ गाडगीळ म्हणाले, "येत्या दोन वर्षांत ५० ज्वेलर्स शॉप देशभर उघडले जातील. तरुण पिढीला सोबत घेऊन उत्तम सेवा आणि कालानुरूप डिझाईनद्वारे ग्राहकांना आकर्षित केले जाईल. लाईटस्टाईल ही संकल्पना ग्राहकांना निश्चितच भुरळ पाडेल." यावेळी सारा तेंडुलकर, महेंद्रशेठ घरत, प्रीतम म्हात्रे यांचा यथोचित सन्मान पीएनजीचे सौरभ गाडगीळ यांनी केला.

# जेष्ठांसाठी कायदा २०१७ च्या अमंल बजावणीसाठी सर्वपक्षीय उमेदवारांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई दत्ता खंदारे :** धारावीत निवडणुकीची रणधुमाळी सुरु असून निवडून येणाऱ्या प्रभाग क्र १८६ आणि १८८ च्या उमेदवारांसाठी जेष्ठ नागरिकांनी एक आगळा वेगळा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. जेष्ठ नागरिकांसाठी तुम्ही काय करणार आहात यासाठी उमेदवारांना भेटून त्यांची काय भूमिका आहे याबद्दल त्यांना प्रश्न विचारण्यात येत आहे.




निवडणुकीत अनेक आश्वासन दिली जातात परंतु निवडून आल्यानंतर त्याची पूर्तता केली जात नाही. यासाठी जेष्ठ नागरिकांनी सर्व उमेदवारांना भेटून त्यांना जाहीरनामा दिला जात आहे. जर ५वर्षात याची पूर्तता केली नाही तर निवडून आलेल्या उमेदवाराने स्वइच्छेणे पदभारातून मुक्त व्हावे असे जेष्ठ नागरिकांचे मत आहे.

**जेष्ठांसाठी "जाहिरनामा"त**

१)ज्यांचे वय ६०-६५ पेक्षा अधिक आहे त्यांना जेष्ठ नागरिक मानुन त्यांचा सन्मान करावा. २) चांगले रस्ते, स्वच्छ पाणी, शौचालय,मैदान-क्रिंडागणे, वाचनालय, विरंगुळा केंद्र, शासनाच्या सोई सुविधा व निराधारांना स्वयं रोजगार हमी हवी.३)जेष्ठांसाठी पोलिस ठाण्यात स्वतंत्र कक्ष, दर महा पोलिस,म.न.पा. व शासनासोबत बैठक व्हावी.४) जेष्ठांसाठी स्वतंत्र कार्यालय,करमणुक केंद्र तसेच महिन्यातुन एकदा

वैदयकिय तपासणी व्हावी.५)निराधार वृद्धांना मोफत, औषधे, वार्षिक धार्मिक स्थळांना भेट व गरजवंताना २ वेळचे जेवन ६)विविध पेन्शन योजना, जेष्ठ नागरिक ओळखपत्र, वार्षिक स्नेहसंमेलन,सण उत्सवात मदत

७)धारावी परिसरातील सर्व रेस्टॉरन्ट / बार / हॉटेल/ शाळा कॉलेजेस / दवाखाने व इतर ठिकाणी शौचालयाच्या ठिकाणी इंग्लिश टॉयलेट प्रवेश मिळावा तसा बोर्ड लावला जावा.८)प्रभाग क्र. १८६ व १८८ मधील जेष्ठांची नोंदणी करून (सर्वे) सर्व माहिती जमा करावी.९)आमच्या सह आमचे कुटूंब / परिसर स्वच्छ, सुंदर व सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी घ्यावी.१०)

रस्त्यावरील वाहतुक समस्या / वादयाचे आवाजांचे प्रदर्शन गर्दीतील वर्दळ, धुळीकरण मुक्ती मिळावी.

जेष्ठ नागरिकांचा वचननामा हा प्रभाग क्र १८६आणि १८८ मधील उमेदवारांसाठी असून निवडून आल्याबरोबर त्या उमेदवाराने त्याची अंमलबजावणी करावी असे निवेदन हॅप्पीनेस जेष्ठ नागरिक संघ धारावी तसेच श्री विष्णू कटके,श्री संदीप सोनवणे, सिद्राम इंगळे, श्री दिलीप गाडेकर, झेंडा ग्रुपच्या वतीने देण्यात आले.

# रिसोड येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**

**रिसोड. प्रतिनिधी/ रणजितसिंह. ठाकुर :** रिसोड येथे शक्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद तालुका व सर्व समाजबांधव वतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक समता आणि स्त्री शिक्षणासाठी आयुष्य वेचणाऱ्या सावित्रीबाईंना यावेळी रिसोड वासियांनी अत्यंत आदरभावाने अभिवादन केले.

कार्यक्रमाची सुरुवात समता परिषदेची तालुकाध्यक्ष श्री संतोष मडके यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी सावित्रीबाईंच्या

कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. स्त्री शिक्षणाची ज्योत पेटवून समाजातील अज्ञान



आणि अन्यायाविरुद्ध लढा देणाऱ्या सावित्रीबाईंचे विचार आजही प्रेरणादायी असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. या सोहळ्यामुळे गावातील सामाजिक जाणीव अधिक प्रबळ झाली असून, नव्या पिढीपर्यंत

सावित्रीबाईंचा वैचारिक वारसा पोहोचवण्यास मदत झाली आहे. या कार्यक्रमाला विविध स्तरातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. गणाभाऊ इरतकर.संतोष मडके.केशव पुंड.नंदू भाऊ मगर. भरत भाऊ ईरतकर. राज पुंड.दत्ता मगर. प्रमोद भांदुर्गे. साई इरतकर. भालेराव मॅनेजर. शुभम इरतकर. देविदास मडके. मनीष देगावकर.राहुल भांदुर्गे. संजय यादव. विठ्ठल इरतकर. सचिन हरकळ. रवी इरतकर. शंकर इरतकर. बाळू इरतकर. गोपाल इरतकर.सतीश सोनुने. किशोर इरतकर. हे उपस्थित होते.

# दलित मित्र एकबाल पेंटर फाउंडेशन च्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** पाटोदा येथे जिल्हा परिषद कन्या शाळेमध्ये माई सावित्रीबाई फुले यांची जयंती गेल्या ३५ वर्षापासून दलित मित्र एकबाल पेंटर हे स्वतः स्वखर्चाने दरवर्षी साजरी करत असतात. त्याच पद्धतीने या वर्षी अनेक शाळेतील विद्यार्थ्यांचे भाषण वक्तृत्व स्पर्धा व समाजामध्ये काम करणारे सामाजिक कार्यकर्ते यांना पुरस्कार देण्यात येतो. या वर्षीचा पुरस्कार प्रा.मोहन परजणे सर यांना देण्यात आला. दलित मित्र एकबाल पेंटर फाउंडेशन च्या वतीने अनेक उपक्रम प्रत्येक वर्षी घेतले जातात. या मध्येच सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने मुला-मुलींचे भाषण स्पर्धेमध्ये अनेक मुलींना स्पर्धेचे बक्षीस म्हणून महापुरुषांची पुस्तके व त्यांना स्टेज करिअर मिळण्यासाठी ही स्पर्धा दरवर्षी आयोजित करण्यात येते. या कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती प्रा.मोहन परजणे सर यांनी आपल्या मनोगतमध्ये मुलींनी सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेतला पाहिजे असे सांगितले. शेतकरी नेते गणेश कवडे यांनी बोलतांना सांगितले की, मराठी शाळेबरोबरच उर्दू शाळेच्या मुलींनी पण भाषणामध्ये जास्तीत जास्त सहभाग नोंदवल्या बद्दल कौतुक केले. माजी मुख्याध्यापक एल.आर.जाधव सर यांनी बोलतांना सांगितले की, दलित मित्र एकबाल पेंटर हे



पाटोद्याचे भूषण आहे. दरवर्षी जयंती साजरी करतात त्यांचा आदर्श सर्वांनी घ्यावा,भाई विष्णुपंत घोलप यांनी सांगितले की,सावित्रीबाई फुले यांची जयंती आली की, आम्हाला पेंटर साहेबांची आठवण येते. कॉ.महादेव नागरगोजे, जाहेर पाटील, भाई विष्णुपंत घोलप ,एल.आर.जाधव, गणेश कवडे, हरीभगत सर, दिलीपराव गाडे, भगवानराव जावळे, दे.मा. जावळे गुरूजी, काळूशे सर, सय्यद इलियास, हादी सर, मुकरम बेग, नजान सर, खेडकर मॅडम, समिना बाजी, जबीन बाजी, तब्सुम बाजी, रफत बाजी, शेख फय्याज, सय्यद ईशरत, जावळे बाई, डिडुळ बाई, बुद्रुक बाई, साठे, पारवे, सय्यद रेहान, सय्यद इम्रान तसेच जिल्हा परिषद कन्या शाळेतील शिक्षक शिक्षिका व कर्मचारी या वेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे बक्षीस वितरण नंतर शेवटी सर्वांचे आभार सज्जाद सय्यद यांनी मानले.

# महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने जबरीने खेचणा-या ०३ अट्टल चोरटयांना गुन्हे शाखा कक्ष ०३, पनवेल यांनी अटक करून ०४ गुन्हे आणले उघडकीस

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने जबरीने खेचणा-या ०३ अट्टल चोरटयांना गुन्हे शाखा कक्ष ०३, पनवेल यांनी अटक करून त्यांच्या कडून ४ गुन्हे उघडकीस आणले आहेत. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे हद्दीमध्ये काही अनोळखी आरोपी हे मोटारसायकल वरून भरधाव वेगाने येवून महिलांच्या गळ्यातील सोन्याचे किंमती व मौल्यवान दागिने जबरीने खेचुन जबरी चोरी करत असल्याबाबत अनेक गुन्हे दाखल आहेत.

महिलांसाठी सोन्याचे दागिने हा भावनिक विषय असतो. अशा गंभीर गुन्हयांची तात्काळ उकल करण्याबाबत पोलीस आयुक्त, मिलिंद भारंबे, सह. पोलीस आयुक्त संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, सचिन गुंजाळ यांनी सुचना दिलेल्या होत्या. गुन्हेगार मोटरसायकल वरून अचानक येवून काही क्षणात महिलांचे गळ्यातील सोन्याचे दागिने जबरीने खेचुन नेतात. अशा आरोपींबाबत फिर्यादी व साक्षीदारांकडे विचारपुस करताना मर्यादीत माहिती मिळते. त्यामुळे सदरचे गुन्हे उघडकीस आणणे पोलीसांना आव्हानात्मक असते. गुन्हे शाखा कक्ष ३, पनवेल, नवी मुंबई कडील पोलीस पथकाने नवी मुंबई



पोलीस आयुक्तालयामध्ये घडलेल्या गुन्हयांच्या घटनास्थळी जावून फिर्यादी, गुन्हयांची माहिती प्राप्त केली. घडलेल्या साक्षीदार यांना भेटुन, घटनास्थळाचे आजुबाजुचे प्राप्त सीसीटिव्ही फुटेजचे सखोल तपासणी करून तसेच तांत्रिक तपास करुन पनवेल शहर पोलीस ठाणे दाखल गुन्हयामध्ये ०३ आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी मोहम्मद शफिक हनिफ शाह (वय २८ वर्षे), विवेक विश्वनाथ सोनार (वय २५ वर्षे), आदर्श हरिसिंग दर्जी (वय २५ वर्षे) या आरोपीना अटक केली आहे. वरील आरोपींना अटक करून त्यांचेकडे कौशल्यपुर्ण तपास करुन ९,९३,५००/- रूपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत केला. तसेच पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील २ कामोठे आणि खारघर पोलीस ठाण्यातील १ -१ असे ४ गुन्हे उघडकीस आणुन त्या गुन्हयातील जबरी चोरी झालेला १०० टक्के मुददेमाल हस्तगत केला आहे. सदरची कामगिरी अजयकुमार लांडगे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि अविनाश काळदाते, सपोनि पवन नांद्रे, पोउपनि अभयसिंह शिंदे, माधव इंगळे, सफौ अनिल पाटील, पोहवा रमेश शिंदे, प्रमोद राजपुत, प्रशांत काटकर, अजित पाटील, निलेश पाटील, रूपेश पाटील, इंद्रजित कानु, दिपक डोंगरे, सागर रसाळ, मपोहवा हिरकणी पवार, पोना अजिनाथ फुंदे, मपोना विनया पाटील, पोशि लवंकुश शिंगाडे, प्रसाद घरत, विक्रांत माळी यांनी केली आहे.

## सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त शिक्षिकांनी घेतला चित्रपटाचा आनंद



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे, ज्ञानमंदिर कळंबोली विद्यालयातील स्त्री शिक्षकांनी सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त. के.के. सिनेमा कामोठे येथे क्रांतीज्योती विद्यालय हा चित्रपट पाहण्याचा आनंद घेतला.महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सावित्रीबाई फुले यांनी केले होते, त्यांच्या जयंतीनिमित्त हा चित्रपट पाहण्याचा आनंद शिक्षिकांनी लुटला. चित्रपट पाहण्यासाठी एकत्रित आलेल्या सावित्रीच्या लेकींनी सावित्रीबाई फुले यांच्या आदर्शांना उजाळा दिला आणि त्यांच्या कार्याची प्रेरणा घेतली.

## बाळशास्त्रींचे 'दर्पण' ते सोशल मीडियाचे रणांगण; निर्भीड लेखणीची मशाल आजही तेवतीच!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण'चा पहिला अंक काढला आणि मराठी पत्रकारितेच्या एका सुवर्णयुगाची पहाट झाली. आज पावणेदोनशे वर्षांनंतरही पत्रकारितेचा हा प्रवास तितक्याच उत्साहाने आणि नव्या आव्हानांसह सुरू आहे. बाळशास्त्रींनी ज्या उद्देशाने लेखणी हाती धरली होती, तो उद्देश होता लोकशिक्षण आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे. आजही जेव्हा आपण 'पत्रकार दिन' साजरा करतो, तेव्हा समाजाचा आरसा म्हणून पत्रकारितेची भूमिका किती महत्त्वाची आहे, याचे भान अधिक प्रकर्षाने येते.

भारतीय लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पत्रकारितेने स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरही देशाला दिशा देण्याचे काम केले आहे. लोकमान्य टिळकांचे 'केसरी' असो वा आगरकरांचे 'सुधारक', या पत्रांनी केवळ बातम्या दिल्या नाहीत, तर समाजाच्या विचारांना प्रवृत्त केले. काळाच्या ओघात पत्रकारितेचे स्वरूप बदलले. हाताने चालणाऱ्या खिळ्यांच्या प्रेसपासून सुरू झालेला हा प्रवास आज सॅटेलाईट आणि डिजिटल क्रांतीपर्यंत येऊन पोहोचला आहे. पूर्वी बातमी वाचण्यासाठी दुसऱ्या दिवसाच्या पहाटेची वाट पाहावी लागायची, आज ती क्षणार्धात आपल्या मोबाईल स्क्रीनवर धडकते. वेगाच्या या स्पर्धेत पत्रकारितेने आपले महत्त्व टिकवून ठेवले असले, तरी विश्वासार्हतेचे आव्हान मात्र मोठे आहे.

आजच्या 'फेक न्यूज' आणि सोशल मीडियाच्या गदारोळात सर्वसामान्य माणूस गोंधळून जात असताना, मुख्य प्रवाहातील पत्रकारिता हीच दीपस्तंभाचे काम करत आहे. सत्तेला प्रश्न विचारण्याचे धाडस आणि सामान्य माणसाच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्याची संवेदनशीलता हीच खऱ्या पत्रकारितेची ओळख आहे. संकटकाळात, मग ते महापूर असो, महामारी असो किंवा सीमावर्ती भागातील तणाव, पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता मैदानात उतरतो, तेव्हाच सामान्यांपर्यंत सत्य पोहोचते.मात्र, बदलत्या काळात पत्रकारितेसमोर अनेक आर्थिक आणि राजकीय आव्हाने उभी ठाकली आहेत.



माहितीचा महापूर असूनही सत्यापर्यंत पोहोचणे कठीण होत चालले आहे. अशा वेळी बाळशास्त्री जांभेकरांचे विचार आपल्याला मार्ग दाखवतात. पत्रकारितेने नेहमीच सामान्यांच्या हिताला प्राधान्य द्यायला हवे. केवळ माहिती देणे म्हणजे पत्रकारिता नव्हे, तर त्या माहितीचा समाजावर काय परिणाम होतो, याचे भान राखणे म्हणजे खरी पत्रकारिता होय.

आजच्या या दिनानिमित्त केवळ पत्रकारांचे कौतुक करून चालणार नाही, तर त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे आणि पत्रकारितेच्या मूल्यांचे जतन करणे ही समाजाचीही जबाबदारी आहे. 'दर्पण'कारांनी लावलेले हे छोटेसे रोपटे आज एका विशाल वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. या वटवृक्षाच्या सावलीत लोकशाही अधिक प्रगल्भ व्हावी, हीच आजच्या पत्रकार दिनाची खरी फलश्रुती ठरेल. लेखणीचा हा वसा आणि वारसा असाच अविरत चालू राहो, हीच सदिच्छा!

# प्रांत व तहसील कार्यालयात अस्वच्छतेचा कळस मनसेचे प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत)दिंडोरी :**प्रांत कार्यालय व तहसील कार्यालय परिसरात स्वच्छतेअभावी निर्माण झालेल्या गंभीर समस्येबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे दिंडोरी तालुका अध्यक्ष मा. नामदेव गावित यांनी मा. प्रांत अधिकारी साहेब, दिंडोरी यांना लेखी निवेदन सादर केले.

तहसील कार्यालयाच्या संपूर्ण परिसरात मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला असून नियमित साफसफाई होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. ग्रामीण भागातून दररोज मोठ्या संख्येने वयोवृद्ध नागरिक, महिला व सर्वसामान्य जनता विविध



शासकीय कामांसाठी प्रांत व तहसील कार्यालयात ये-जा करत असते. मात्र, कार्यालय परिसरात सर्वत्र कचरा पसरलेला असल्याने नागरिकांना बसण्यासाठी किंवा उभे राहण्यासाठी स्वच्छ, सुरक्षित व सुसज्ज जागा उपलब्ध होत नाही. यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असून त्यांच्यात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

ही बाब अत्यंत गंभीर असून प्रशासनाने याची तातडीने दखल घ्यावी. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना त्वरित स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश द्यावेत, तसेच भविष्यात कार्यालय परिसरात नियमित व प्रभावी साफसफाईची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात यावी, अशी ठाम मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

नामदेव देवराम गावित – तालुका अध्यक्ष दिंडोरी, सतिश मालसाने – तालुका उपाध्यक्ष,रोशन दिवटे तालुका उपाध्यक्ष ,नंदा कराटे – महिला जिल्हा उपाध्यक्ष अध्यक्ष,पांडुरंग गावंडे. उत्तम चौरे,दत्तू धूळे.

## खोपोली येथे पार पडलेल्या पत्रकार क्रिकेट संघाच्या वतीने खुल्या क्रिकेट स्पर्धेत जिल्हा परिषद शिक्षक संघाचा प्रथम क्रमांक

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी खालापूर तालुका /संतोष शेवाळे :** सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील खोपोली पत्रकार क्रिकेट संघाच्या वतीने क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील स्पर्धेत खालापुर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ,खालापुर पोलिस ठाणे,खालापुर वकील असोसिएशन, खोपोली खालापुर डॉक्टर असोसिएशन, खोपोली पोलिस ठाणे, खोपोली नगरपरिषद,हेल्प फाऊंडेशन, खोपोली खालापुर पत्रकार,खालापुर शिक्षक इत्यादी क्रिकेट टीम संघाच्या स्पर्धेचे



आयोजन हे आयोजक पत्रकार तय्यब खान व पत्रकार आकाश जाधव यांनी यशस्वीपणे पूर्ण केले.

खालापूर पत्रकार संघ यांच्या वतीने पंत पाटणकर मैदान, खोपोली येथे आयोजित खुल्या क्रिकेट स्पर्धेत जिल्हा परिषद शिक्षक संघाने शानदार कामगिरी करत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या विजयामुळे शिक्षक क्रिकेट रसिकांसाठी आजचा दिवस विशेष ठरला.स्पर्धेदरम्यान शिक्षक बंधूंनी दाखवलेले शिस्तबद्ध, उत्साही व दर्जेदार क्रिकेट प्रदर्शन हे विद्यार्थ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल, असे गौरवोद्गार यावेळी उपस्थित पत्रकार बंधूंनी काढले. शिक्षक हे केवळ अध्यापनातच नव्हे तर क्रीडा क्षेत्रातही आदर्श ठरू शकतात, हे या सामन्यांतून अधोरेखित झाले.या यशाबद्दल समस्त खालापूर तालुक्यातील शिक्षक बंधू-भगिनी तसेच पंचायत समिती खालापूर यांच्या वतीने विजयी संघाचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.स्पर्धेतील वैयक्तिक कामगिरीबाबत,उत्कृष्ट फलंदाज – श्री. भागिनाथ पोटे सर (शाळा : नारंगी)उत्कृष्ट गोलंदाज – श्री. दादासाहेब मुंजाळ सर (शाळा : सावरोली)यांची निवड करण्यात आली.जिल्हा परिषद शिक्षक संघाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




**जि प प्रा शा मसला तांडा येथे स्त्री शिक्षण चळवळीच्या आद्य क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.प्रसंगी विदयार्थी, शिक्षकांची भासणे झाली.श्री शिंदे सरांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर मुख्याध्यापक श्री सिरसाठ सरांनी आभारप्रदर्शन केले. प्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, अंगणवाडी ताई, पालक उपस्थित होते. ( दैनिक युवक आधार)**

## कामोठे परिसरात भाजप महायुती भक्कम; प्रभाग १३ मध्ये चारही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील – लोकनेते रामशेठ ठाकूर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** कामोठे परिसरात भाजप महायुतीची ताकद भक्कम असून येणाऱ्या पनवेल महानगरपालिका निवडणुकीत महाविकास आघाडीची हवा आधीच गुल झाली आहे, विकासाचा दृष्टीकोन घेऊन अनेक विकासाची कामे भाजपच्यावतीने झाली आहेत, त्यामुळे प्रभाग क्रमांक १३ मधील महायुतीचे चारही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील. असा विश्वास महानगरपालिका निवडणूक प्रभारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केला.

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कामोठे परिसरात भाजप महायुतीच्या उमेदवारांचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे. भाजप महायुतीच्या नेतृत्वाखाली झालेल्या चौफेर विकासकामांमुळे महायुतीला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. विकासाच्या मुद्द्यावर भाजपने केलेल्या कामांची दखल मतदार घेत



असून त्याचा थेट फायदा महायुतीच्या उमेदवारांना होत आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कामोठे येथील मानसरोवर कॉम्प्लेक्स परिसरात प्रभाग क्रमांक १३ मधील उमेदवारांच्या समर्थनार्थ प्रचार केला. यावेळी भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय) या महायुतीच्या घटक पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रभाग क्रमांक १३ मधील महायुतीचे उमेदवार रवींद्र गणपत जोशी, विकास नारायण घरत, हेमलता रवी गोवारी आणि शिला भाऊ भगत यांनी घरोघरी भेटी देत मतदारांशी संवाद साधला व महायुतीला विजयी करण्याचे आवाहन केले. या प्रचारावेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, के. के. म्हात्रे, राजेश म्हात्रे, श्रावण घरत, रवी गोवारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# अमजद पठाण यांचा समर्थकांसह शिवसेनेत प्रवेश; आमदार अब्दुल सत्तारांच्या नेतृत्वावर दाखवला विश्वास

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** राज्याचे माजी मंत्री आमदार अब्दुल सत्तार यांच्या विकासकामांनी प्रेरित होऊन भाजपा अल्पसंख्यांक आघाडीचे तालुकाध्यक्ष तथा भवन मंडळ अध्यक्ष अमजद पठाण यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. आमदार अब्दुल सत्तार यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.



मतदारसंघाचा कायापालट करणाऱ्या आमदार सत्तार यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून अमजद पठाण यांच्यासह अक्रम इस्माईल शेख (भाजपा अल्पसंख्यांक तालुका चिटणीस), कलीम पठाण (शाखा अध्यक्ष), जावेद पठाण (शाखा उपाध्यक्ष), अशपाक शेख, शरीफ सय्यद, हकीम शेख, रईस पठाण, बाबा पठाण, आसेफ पठाण, समीर पठाण, अरबाज पठाण, परवेज पठाण, रहीम शेख, मुसव्वीर पठाण, फैज पठाण आणि सोहेल शाह या प्रमुख कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला.

यावेळी सेवानिवृत्त विभागीय निबंधक देविदास पालोदकर, माजी जि.प. सदस्य रामदास पालोदकर, प्रफुल्ल हुरणे, मुनाफ पठाण, रामेश्वर समिंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते. "सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवणारे नेतृत्व म्हणून आम्ही आमदार अब्दुल सत्तार साहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे," अशी भावना अमजद पठाण यांनी यावेळी व्यक्त केली. या पक्षप्रवेशामुळे राजकीय वर्तुळात अमजद पठाण व त्यांच्या सहकाऱ्यांचे स्वागत होत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# शेकाप महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्षा व सामाजिक कार्यकर्त्या दिक्षाताई दिलीप जाधव यांचा भाजपमध्ये जाहीर पक्षप्रवेश

## शेतकरी कामगार पक्षाला आणखी एक हादरा; तळोजा परिसरात भाजपची संघटनात्मक ताकद अधिक बळकट

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर तळोजा फेज-२ येथील सामाजिक कार्यकर्त्या आणि शेकाप महिला आघाडीच्या रायगड जिल्हा उपाध्यक्षा दिक्षाताई दिलीप जाधव यांनी शेकडो महिला व पुरुष कार्यकर्त्यांच्या फौजेसह भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर पक्षप्रवेश केला. हा पक्षप्रवेश कार्यक्रम अत्यंत उत्साहात, जल्लोषपूर्ण वातावरणात पार पडला असून शेतकरी कामगार पक्षाला आणखी एक मोठा हादरा बसला आहे. त्यामुळे तळोजा व पनवेल परिसरातील राजकीय वर्तुळात याची मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे. लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आणि त्यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा तळोजा फेज २ येथे पार पडला. यावेळी महंत जितेंद्र महाराज, विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील, भाजप रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, वासुदेव घरत, वसंतराव नाईक, भाजपचे पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, नंदकुमार म्हात्रे, माजी सरपंच नितीन भोईर, छगन राठोड, उमेश



कुंभार, हरेश पवार,अशोक शेडगे, विजय मालवे, सुधीर राठोड, अरुण राठोड, अशोक वीरकर, रुपेश चव्हाण, सुनील गाडेकर यांच्यासह भाजपचे अनेक ज्येष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात मान्यवरांनी दिक्षाताई दिलीप जाधव यांचे भारतीय जनता पार्टीमध्ये स्वागत करत त्यांच्या सामाजिक कार्याचा विशेष उल्लेख केला. दिक्षाताई जाधव यांनी गेल्या अनेक वर्षांपासून तळोजा फेज-२ परिसरात सामाजिक, शैक्षणिक व नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांसाठी सातत्याने कार्य केले असून त्यांच्या कार्याची दखल घेत भाजपने त्यांचे स्वागत केल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.याप्रसंगी बोलताना दिक्षा फाऊंडेशनच्या अध्यक्षा दिक्षाताई दिलीप जाधव यांनी सांगितले की, तळोजा व पनवेल परिसरात होत असलेल्या विकासकामांमुळे प्रेरित होऊन मी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. समाजकारण व विकासाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी मी भाजपच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे काम करेन, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या पक्षप्रवेशामुळे तळोजा परिसरात भाजपची संघटनात्मक ताकद मोठ्या प्रमाणात वाढली असून आगामी पनवेल महानगरपालिका निवडणुकांमध्ये याचा निश्चित सकारात्मक परिणाम होईल, असा विश्वास उपस्थित भाजप पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

> **जगातील सर्वाधिक सदस्यसंख्या असलेला भारतीय जनता पक्ष हा देशाच्या विकासाचा मजबूत आधारस्तंभ आहे. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम नेतृत्वाखाली देश व राज्याने झपाट्याने विकासाची वाटचाल केली आहे. सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास हे घोषवाक्य केवळ शब्दांत न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरले आहे. विविध लोककल्याणकारी योजना समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यात आल्या आहेत. महाविकास आघाडीच्या काळात ज्या विकासापासून जनता वंचित राहिली होती, तो विकास आता देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा गतिमान झाला आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे राज्याने विकासाची नवी उंची गाठली आहे. अशा विकासाभिमुख विचारधारेत सहभागी झाल्याबद्दल तुमचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. तुम्हाला पक्षात सन्मान आणि काम करण्याची योग्य संधी देण्यात येईल.**
>
> **- आमदार प्रशांत ठाकूर**

# मोहदरी ग्रामपंचायत सरपंच पदासाठी नथू कोळेकर इच्छुक उमेदवार

## युवा सुशिक्षित,ग्रामपंचायत चा अभ्यास असणारे नेतृत्व

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी/ राजू गायकवाड(मोहदरी) :** बोटावर मोजण्याइतके दिवस ग्रामपंचायत सरपंच पदाचा कार्यकाळ संपण्यासाठी राहिलेले असताना निवडणुकीसाठी लवकरच बिगुल वाजणार आहे येणारी निवडणूक ही थेट जनतेतून सरपंच होणारी असल्यामुळे लोकांची पसंती ज्याला आहे तोच सरपंच होणार आहे यामुळे प्रस्तापित राजकारण्यांना घाम फुटला आहे अशातच समाजकार्याचे



शिक्षण घेतलेला आणि ग्रामपंचायत चा गाढा अभ्यास असलेला युवक नथू कोळेकर हा ग्रामपंचायत निवडणूक लढवण्यास इच्छुक आहे असे त्यांनी दैनिक युवक आधार ला सांगितले आहे मोहदरी गावातील लोकांची सेवा करायची, लोकांना चांगल्या सोयी सुविधा उपलब्ध करून द्यायच्या ग्रामपंचायत चा कारभार हा पारदर्शक असणार असे त्यांचे म्हणणे आहे त्याच्या मते कोणत्याही घरकुल लाभार्थ्यांना कोणालाही एक रुपया देण्याचे काम पडणार नाही सर्व गोष्टी एका छताखाली आणल्या जातील गावात विकास कामे केली जातील या त्याच्या जाहीरनाम्याचा गावातील लोक नक्कीच विचार करून त्यांना निवडून देतील असे ते म्हणाले.

# पाथरी तालुका मराठी पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर; तालुका अध्यक्षपदी गणेश जत्ती

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** अखील भारतीय मराठी पत्रकार परिषद संलग्न पाथरी तालुका पत्रकार संघाची २०२६ ते २०२८ ची नुतन तालुका कार्यकारिणी सर्वानुमते घोषित करण्यात आली असून पाथरी तालुका अध्यक्ष म्हणून गणेश जत्ती यांची निवड जाहीर करण्यात आली आहे मुंबई मराठी पत्रकार परिषद संलग्नित पाथरी तालुका पत्रकार संघाच्या निवडीची बैठक रविवारी ४ जानेवारी रोजी शासकीय विश्रामगृह येथे मराठी पत्रकार



परिषदेचे राज्य सरचिटणीस प्राचार्य सुरेश नाईकवाडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली यावेळी प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजु हाट्टेकर परभणी जिल्हा मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रभु दिपके कार्याध्यक्ष लक्ष्मण मानोलीकर जिल्हा उपाध्यक्ष किरण घुंबरे जेष्ठ पत्रकार वडकुते यांची उपस्थिती होती यावेळी पाथरी तालुकाअध्यक्ष म्हणून पत्रकार गणेश जत्ती यांची एकमताने निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष विठ्ठल प्रधान. सचिव मुरलीधर गोंगे .कोषाध्यक्ष दत्ता उफाडे .सहकोषाध्यक्ष शिवाजीराव इंगळे .तालुका संघटक अशोक नवघरे . सल्लागार अँड श्रीपाद कोंत. जिल्हा सदस्य धनंजय आडसकर. जिल्हा प्रतिनिधी किरण घुंबरे . सदस्य म्हणून लक्ष्मण उजगरे . बाबा दाढेल .मनोज भदर्गे.शेख जलील. यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे यावेळी नुतनीकरणीचे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून पूढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी प्राचार्य नाईकवाडे .दिपके.घुंबरे .अँड कोंत यांनी आपले मनोगत यावेळी व्यक्त केले

# थेरोंडा फाटा ते वरसोलपाडा स्मशानभूमी मार्ग २३ वर्षांनंतर मोकळा!

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे /अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** रेवदंडा थेरोंडा फाट्यापासून थेरोंडा वरसोलपाडा हा रस्ता थेट वरसोलपाडा स्मशानभूमीपर्यंत नेतो. चौलचौकी, चौल नाका, भाट गल्ली, थेरोंडा पानशे वाडी, दांडेकर आळी, कोटकर आळी या घनदाट वस्त्यांतून अंत्ययात्रा जाणाऱ्या या रस्त्याची पावसाळ्यात चिखलमय दयनीय अवस्था झाली होती. मोठमोठाले खड्डे, चिखलाचे साम्राज्य! ज्येष्ठ नागरिक चालताना पडून जखमी होत होते, तर




रहदारी करणाऱ्यांसाठी हा मार्ग जीवघेणा ठरला होता.या रस्त्याच्या खराब अवस्थेकडे प्रथम लक्ष देत समाजसेवक अनिल कालेकर यांनी स्थानिक शिवसैनिक संजय काबळे यांना सूचित केले. दोघांनी मिळून सतत दोन वर्षे स्थानिक आमदारांकडे अर्ज करून अथक पाठपुरावा केला. कार्यकर्त्यांच्या हाकेला कानावर हात ठेवणारे आमदार महेंद्र दळवी यांनी आमदार निधीतून पहिल्या टप्प्यातील कामासाठी तात्काळ निधी मंजूर केला. रेवदंडा ग्रामपंचायतीचे सरपंच प्रफुल्ल मोरे यांचेही यात मोलाचे सहकार्य लाभले. परिणामी, सुमारे २३ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर हा रस्ता मोकळा झाला असून, पहिल्या टप्प्याचे काम पूर्णत्वास आले आहे!थेरोंडा ग्रामस्थ, पानशे वाडी, वरसोलपाडा, दांडेकर आळीतील नागरिकांनी आमदार महेंद्रशेठ दळवी आणि सरपंच प्रफुल्ल मोरे यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत, अशी माहिती समाजसेवक अनिल कालेकर यांनी दिली.

# राज्यातील आरोग्य व्यवस्थेचा ९ वर्षांनंतरही शासन निर्णय नाही

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / रमेश औताडे :** महाराष्ट्र राज्यातील वैद्यकीय अधिकारी गट 'ब' यांच्या सेवाखंड नियमित संबंधीचा महत्त्वाचा प्रश्न तब्बल नऊ वर्षांनंतरही प्रलंबित असल्याने असंतोष वाढला आहे. मुंबई व संभाजीनगर येथील महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी अद्याप न झाल्याने वैद्यकीय अधिकाऱ्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य राजपत्रित वैद्यकीय अधिकारी महासंघाने केला आहे.

महासंघाचे अध्यक्ष डॉ. अरुण कोळी यांनी मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना निवेदन देत तातडीने शासन आदेश काढण्याची मागणी केली आहे. आदेश निघाले नाहीत तर वैद्यकीय अधिकाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरून



आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

न्यायाधिकरणाने स्पष्ट दिलेल्या आदेशांनुसार वैद्यकीय अधिकारी गट 'ब' यांची सेवासमावेशनपूर्व अस्थायी सेवा कालावधीतील तांत्रिक सेवा खंड माफ करून सेवा नियमित करणे, वेतनसंरक्षण, वेतनवाढीचा लाभ, अर्जित रजा तसेच प्रथम नियुक्तीपासून वेतननिश्चिती करून कालबद्ध पदोन्नतीचा लाभ देण्याचे निर्देश देण्यात आले होते.

या संदर्भात यापूर्वी २००९ व २०१७ च्या शासन निर्णयांनुसार समान प्रकरणांमध्ये लाभ देण्यात आले असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र सद्यस्थितीत न्यायाधिकरणाचे आदेश असूनही शासनाकडून अद्याप कोणताही ठोस शासन आदेश निर्गमित करण्यात आलेला नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांना बाधा पोहोचत असून संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांवर अन्याय व दुजाभाव होत असल्याचा आरोप महासंघाने केला आहे.

याशिवाय, गट 'ब' संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांबाबत सेवा विषयक धोरणात्मक निर्णय घेताना खासगी व्यवसाय रोख भत्ता तसेच पदव्युत्तर शिक्षणानंतर ३ ते ६ अतिरिक्त वेतनवाढ न देण्याचे निर्णय अन्यायकारक असल्याचे महासंघाचे म्हणणे आहे.

सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित दराने एनपीए व अतिरिक्त वेतनवाढ देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

# दुर्मिळ अशा मूत्रमार्गाच्या समस्येने पिडीत २५ वर्षीय तरुणावर मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई वार्ताहर :** मेडिकव्हर हॉस्पिटलमधील मूत्रविकार तज्ज्ञ डॉ. विकास भिसे यांच्या नेतृत्वाखालील टिमने दुर्मिळ अशा मूत्रमार्गाच्या समस्येने पिडीत २५ वर्षीय तरुणावर यशस्वी उपचार केले. रुग्णाला सतत डाव्या बाजूच्या वेदना आणि मूत्रमार्गासंबंधीत अडथळा, सतत ताप येत असल्याने त्याने उपचारांकरिता अनेक रुग्णालयांकड् धाव घेतली मात्र अचूक निदान झाले नाही. अखेर तो मेडिकव्हर हॉस्पिटलच्या युरोलॉजी विभागात दाखल झाला जिथे डॉ. विकास भिसे यांच्या नेतृत्वाखालील टीमने त्याची तपासणी करुन रुग्णावर यशस्वी उपचार केले.

नवी मुंबईतील कामोठे येथे राहणारे श्री. महेश (नाव बदलले आहे)* हे एक



व्यावसायिक असून , त्यांना डाव्या बाजूस वेदना आणि ताप यासारखी लक्षणे जाणवत होती. त्यांनी विविध रुग्णालयांमध्ये उपचाराकरिता धाव घेतली, परंतु निदान होऊ शकले नाही. त्यानंतर रुग्णाने खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पीटलमध्ये धाव घेतली. अल्ट्रासाऊंडमध्ये डाव्या बाजूला मध्यम हायड्रोनेफ्रोसिस दिसून आला. तर २८ ऑक्टोबर रोजी पेल्वी-युरेटेरिक जंक्शन (PUJ) अरुंद असलेल्या सीटी युरोग्राफीमध्ये मूत्रमार्ग वाढल्याचे निदान झाले.

डॉ. विकास भिसे सांगतात की, रुग्ण जेव्हा उपचाराकरिता आला तेव्हा तो वेदनेने अस्वस्थ झाला होता. आम्ही त्वरीत रेट्रोग्रेड पायलोग्राफी (Retrograde Pyelography)म्हणजे मूत्रपिंड, मूत्रवाहिनी (ureter) आणि मूत्राशय (bladder) यांची तपासणी करण्यासाठी वापरली जाणारी एक वैद्यकीय इमेजिंग प्रक्रिया केली जिथे आम्हाला मूत्रमार्गात एक अडथळा दिसून आला. आम्ही टप्प्याटप्प्याने उपचार करण्याची योजना आखली ज्यामध्ये लॅपरोस्कोपिक युरेटेरिक रीइम्प्लांटेशन समाविष्ट होते, त्यानंतर चार आठवड्यांनंतर लॅप्रोस्कोपिक पायलोप्लास्टी केली गेली. दोन्ही शस्त्रक्रिया सुरळीत पार पडल्या आणि त्याचे मूत्रमार्ग आता सामान्यपणे काम करत आहे.

डॉ. विकास भिसे पुढे सांगतात की, रुग्णाची मूत्रपिंडातून मूत्र वाहून नेणाऱ्या नळी अरुंद झाली होती आणि सहसा ते दुर्मिळ असते. हा अरुंदपणा दूर करत आम्ही मूत्रमार्गासाठी एक सामान्य मार्ग तयार केला. रुग्णावर योग्य वेळी उपचार न केल्यास मूत्रपिंडांचे आणखी नुकसान होऊ शकते हे लक्षात घेता त्वरित उपचार सुरु केले. जर तुम्हाला सतत पाठदुखी होत असेल, असह्य वाटत असेल तर त्याकडे दुर्लक्ष न करता वेळीच वैद्यकिय सल्ला घ्या. शस्त्रक्रियेनंतर आता रुग्णाची प्रकृती सुधारत आणि आणि तो आरामदायी जीवन जगत आहे. मूत्रमार्गाच्या या दोन्ही शस्त्रक्रिया सुमारे ९० मिनिटे चालल्या आणि रुग्ण आता बरा झाला असून वेदनामुक्त आयुष्य जगत आहे.

# श्रीवर्धनच्या विकासाची परंपरा जपणारी सुंदर भेट

## नगराध्यक्ष अतुल चौगुले यांच्या दालनात मान्यवरांची छायाचित्रे

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** श्रीवर्धन तालुक्यातील राजकीय व सामाजिक दर्शन घडवणारी एक अर्थपूर्ण घटना नुकतीच पार पडली. श्रीवर्धन तालुका नॅशनल काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष श्री. सादिक राऊत व उपाध्यक्ष श्री. इम्तियाज कोकाटे (मामू) पक्षाचे स्थानिक पदाधिकारी तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित नगराध्यक्ष माननीय अतुलजी चौगुले यांना महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री बॅरिस्टर कै. ए. आर. अंतुले आणि माजी आमदार व मंत्री कै. श्री. रवींद्र ना. राऊत यांची छायाचित्रे भेट म्हणून प्रदान करण्यात आली.श्रीवर्धनच्या विकासासाठी दीर्घकाळ मोलाचे योगदान देणाऱ्या या ज्येष्ठ नेत्यांची आठवण जपण्यासाठी नगराध्यक्ष अतुलजी चौगुले यांनी ही छायाचित्रे आपल्या अधिकृत दालनात लावण्याची सहर्ष



परवानगी दिली. विकासाच्या वाटचालीत मार्गदर्शक ठरलेल्या नेतृत्वाचा सन्मान करण्याची ही भूमिका उपस्थितांमध्ये सकारात्मक संदेश देणारी ठरली.या निर्णयाबद्दल नॅशनल काँग्रेस पार्टी व शिवसेना (उ. बा. ठा.) या दोन्ही पक्षांकडून नगराध्यक्षांचे आभार मानण्यात आले. राजकीय मतभेदांपलीकडे जाऊन विकासकार्याची परंपरा जपण्याच्या या कृतीचे स्थानिक स्तरातून मोठ्या प्रमाणावर कौतुक होत असून, श्रीवर्धनच्या एकात्मतेचा व विकासाभिमुख राजकारणाचा हा सुंदर दाखला असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# पंचायत समिती समोर वंचितचे ढोल बजाव आंदोलन पडले पार



## औरंगाबाद अहावा राष्ट्रीय महामार्गावरील पुलावर संरक्षक भिंतच नाही !!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी बागलाण / दीपक गायकवाड :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २० वर मुल्हेर ते हरणबारी या रस्त्यावर खोल नाल्यावर संरक्षक भिंत नसल्याने अपघात होऊन निरापराध व्यक्तीस जीव गमावावा लागू शकतो यास कारणीभूत कोण ? मुल्हेर ते हरणाबरी येथील खोल वळण रस्ता पूलांवर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्याचे चित्र पहावयास मिळत असून औरंगाबाद, अहवा हा राष्ट्रीय महामार्ग असून सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या दुर्लक्षामुळे पुलावरील संरक्षक कठडे दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहे. या रस्त्यावरून अनेक गावांना तथा गुजरात राज्याला जोडणारा मार्ग असून अदिवासी बांधव, शेतकरी हे मुल्हेर,ताहाराबाद ह्या मेन बाजारपेठीच्या गावास व सटाणा येथे महसूल,वैद्यकीय,शैक्षणिक कामा करिता ये जा करीत असतात यामुळे दुचाकी स्वार,चार चाकी वाहने, ऊसाने भरलेले ट्रॅक्टर यांना रस्त्यावर वाढलेले झाडे याचा अंदाज येत नसतो आणी अश्या परिस्तितीत खोलवर नाला, रस्त्यावरील वळण रस्ता, अरुंद रस्ते,नाला हे फलक सुद्धा नसल्याने अपघात होण्याची शक्यता बळावते त्यासाठी संरक्षक भिंत उभारणे गरजेचे आहे.साल्हेर,मुल्हेर येथे शिवकालीन किल्ले आहेत. त्यामुळे औरंगाबाद,आहवा या राष्ट्रीय महामार्गवर हजारो पर्यटक निसर्ग सौंदर्य, घाट,हरणबारी धरण, शिवकालीन किल्ले पाहण्यासाठी येत असतात त्यामुळे अपघाताची शक्यता अधिक आहे. त्यातच दूसरी कडे हरणबारी हे धरण क्षेत्र असल्याने पावसाचे प्रमाण सुद्धा जास्त असते.धरण १००% टक्के भरल्याने मोसम नदी दुथडी भरून वाहते अशात मोसम नदी पूलावर मुल्हेर ते माळीवाडे रस्त्यावर संरक्षण भिंत किवा लोखंडी ब्यारिगेट्स सुद्धा नाहीत अशात परिस्थितीत तेथे ही अपघात झाल्यास जबाबदार कोण ? असा सवाल आजूबाजूचे ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.तसेच लवकरात लवकर रस्त्याची व पुलाची दुरूस्ती आणि संरक्षक भिंती उभारण्याची मागणी असून संबंधित विभगाने लक्ष देऊन काम करणे गरजेचे आहे.

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके) :** परतूर पंचायत समिती अंतर्गत शासकीय सेवांचा लाभ मिळण्याकरीता तालुक्यातील लाभाथ्यर्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागता आहे. तालुक्यातील आंधळे शासन आणि बहिरे प्रशासन या गोष्टीला जबाबदार आहेत. एकतर पंचायत समितीचे अधिकारी कधीच कार्यालयात भेटत नाहीत. गट विकास अधिकारीही जालना येथे बसूनच पंचायत समितीचा कारभार चालवतात. त्यामुळे जनता त्रस्त आहे. अधिकारी तुपाशी आणि जनता उपाशी अशी परिस्थिती आहे. पैशा शिवाय येथे कामे होत नाहीत, अनेक लोकांनी तक्रारी केल्या, प्रसिध्दी माध्यमांनी बातम्या छापल्या पण याचा काहीही परिणाम या असंवेदनशिल यंत्रणेवर होत नाही. त्यामुळे वंचित बहुजन आघाडी च्या वतीने आज दिनांक 5 जानेवारी 2026 रोजी प्रशासनाचे कान उघडण्यासाठी ढोल बजाओ आंदोलन करण्यात आले आहे. खालील बाबींची गंभिर दखल न घेतल्यास या पेक्षा उग्र आंदोलन



करण्यात येईल व त्याची जबाबदारी प्रशासनाची राहील असे निवेदन वंचित बहुजन आघाडीच्या वतीने देण्यात आले. मागण्या :-

1) तालुक्यातील घरकुल लाभार्थ्यांचा पहिला हप्ता तात्काळ वितरीत करावा.

2)प्रलंबित रमाई आवास योजना घरकुलास मान्यता देण्यात यावी.

3)मनरेगा (नविन जी-राम-जी) योजने अंतर्गत वैयक्ति लाभाच्या योजना जाणुन-बुजुन रोखण्यात आल्यात त्यांना तात्काळ मान्यता देण्यात यावी. (सिंचन विहीर, शेततळे, वृक्ष लागवड आदी) जुन्या कामांचे मस्टर काढण्यासाठी होत असलेली अडवणुक थांबवावी.

4) पंचायत समिती कार्यालयात कर्मचारी व अधिकारी सतत गैरहजर असतात, गट विकास अधिकारी पंचायत समिती कारभार जालना येथुन चालवतात याची चौकशी व्हावी.

5) तालुक्यातील जि. प. शिक्षक आणि केंद्र प्रमुख राजकीय पक्षाच्या बैठकांचे आयोजन, प्रचारात सहभाग, नेत्याच्या दौऱ्याच्या व पक्षीय कार्यक्रमाच्या पोस्ट व्हायरल करणे या गोष्टींची चौकशी करुन दोषीवर कार्यवाही करण्यात यावी.

6)सन 2022 ते आजपर्यंत प्रशासकीय कालावधीत प्राप्त पंचायत समिती शेष आणि 15 वा वित्त आयोग निधीत झालेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्यता यावी.

7) घरकुल लाभार्थ्यांना रेती उपलब्ध करुन देण्यात यावी.

8) अतिवृष्टीमध्ये बाधीत शेतकऱ्यांच्या वाहुन गेलेल्या जमीनी व पडलेल्या विहीरीचे अनुदान अदा करण्यात यावे.

9) घरकुल पूर्ण झाल्यानंतर आवास योजना फलकासह जि.पी. एस. फोटो बंधनकारक आहे त्याची अंमलबजावणी केल्या जात नाही ती करण्यात यावी,यासह अन्य मागण्याकरीता आंदोलन करण्यात येणार आहे. सदर आंदोलनाची दखल घ्यावी अन्यथा होणाऱ्या परिणामास प्रशासन जबाबदार राहील,

या निवेदनावर वंचितचे जिल्हा अध्यक्ष रामप्रसाद थोरात, चोखाजी नाना सौंदर्य, डॉ. किशोर त्रिभुवन, गौतम खंडागळे, गुलाब दवंडे, शेख जमीर, प्रकाश म्हस्के, शिवा स्वामी, डॉ.दीपक भदर्गे,संतोष झरेकर, शिवाजी डोळस, दिपक हिवाळे, स्वप्निल पहाडे, अशोक दवंडे, महादेव पैठणे तसेच असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## एम क्योर फार्मासिटिकल च्या सहकार्याने नागपूर येथे हायपर टेन्शन कॉनफ्लेव्ह नावाचा शैक्षणिक कार्यक्रम आयोजित

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी**

**नागपूर :** महाराष्ट्र असोसिएशन ऑफ फिजिशियन्स (MAP) ने, एमक्योर फार्मास्युटिकल्सच्या सहकार्याने, रविवार, ४ जानेवारी २०२६ रोजी, हॉटेल सेंटर पॉइंट, रामदासपेठ, नागपूर येथे "हायपरटेन्शन कॉन्क्लेव्ह" नावाचा एक सर्वसमावेशक शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केला.

या परिषदेची सुरुवात सकाळी ९.०० वाजता झाली आणि यामध्ये संपूर्ण विभागातील डॉक्टरांनी उत्साहाने सहभाग घेतला. या वैज्ञानिक कार्यक्रमात उच्च रक्तदाबाच्या निदानातील आणि व्यवस्थापनातील समकालीन आव्हाने आणि प्रगतीवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते, ज्यात त्याचे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी, मूत्रपिंड आणि




चयापचयविषयक परिणामांवर विशेष भर देण्यात आला होता.

शैक्षणिक सत्रांमध्ये क्लिनिकल केस सादरीकरणे, उच्च रक्तदाबामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, प्राथमिक आणि दुय्यम उच्च रक्तदाब, प्रतिरोधक उच्च रक्तदाब, क्लिनिकल प्रॅक्टिसमधील कायराल उपचारपद्धती, मूत्रपिंडाच्या आजारासह उच्च रक्तदाब, उच्च रक्तदाबातील अलीकडील प्रगती आणि उच्च रक्तदाब व मधुमेह यांच्यातील परस्परसंबंध या विषयांचा समावेश होता. उच्च रक्तदाबावरील प्रश्नमंजुषीने कार्यक्रमात संवादात्मक मूल्य वाढवले.

डॉ. आर. बी. कलमकर, डॉ. श्रीराम कुलकर्णी, डॉ. जय देशमुख, डॉ. शरद देशमुख, डॉ. निर्मल जयस्वाल, डॉ. अभिजीत रॉयचौधरी, डॉ. जितेश जेसवानी, डॉ. अभिषेक खोब्रागडे, डॉ. प्रमोद गांधी आणि डॉ. शंकर खोब्रागडे यांसारख्या नामांकित प्राध्यापकांनी आपले ज्ञान आणि अनुभव सामायिक केले. नागपूर आणि आसपासच्या भागांतील ज्येष्ठ डॉक्टरांनी सत्रांचे अध्यक्षस्थान भूषवले, ज्यामुळे समृद्ध शैक्षणिक चर्चा झाली. एमएपीचे अध्यक्ष डॉ. श्रीराम कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे मार्गदर्शन केले, तर एमएपीचे उपाध्यक्ष डॉ. शंकर खोब्रागडे यांनी परिषदेच्या आयोजन आणि समन्वयामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. एमएपीच्या सरचिटणीस डॉ. अंजली राजाध्यक्ष यांनी संघटनात्मक सहकार्य केले.हायपरटेन्शन कॉन्क्लेव्हला त्याच्या व्यावहारिक दृष्टिकोन आणि शैक्षणिक खोलीसाठी प्रतिनिधींकडून खूप प्रशंसा मिळाली, ज्यामुळे दैनंदिन वैद्यकीय सरावामध्ये उच्च रक्तदाबाच्या अद्ययावत, पुराव्यावर आधारित व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित झाले.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करून धम्मगुरु भदंत संघरत्न मानके यांच्या वाढदिवसानिमित्त धम्म रथयात्रेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा :** पवनी शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे आद्य शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. त्याचप्रमाणे तथागत गौतम बुद्ध व विश्वभूषण ,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पय्या मेत्ता संघाचे अध्यक्ष धम्मगुरु भदंत संघरत्न मानके यांच्या 64 व्या वाढदिवसानिमित्त केक कापण्यात आले. व त्यांचा शाल, पुष्पगुच्छ, देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर पवनी शहरातून त्यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य धम्म



रथ रॅली करण्यात आली .या रॅलीमध्ये असंख्य बौद्ध उपासक, उपासिका सामील झाले होते. सिंदपुरी येथील स्तुपामध्ये वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला . कार्यक्रम यशस्वी करण्याकरता सामाजिक कार्यकर्ते मनोज बनसोड, पत्रकार लक्ष्मीकांत तागडे, एडवोकेट महेंद्र गोस्वामी, अरुण गोंडाणे माजी पंचायत समिती सदस्य, डॉ. सुनील जीवनतारे माजी सभापती पंचायत समिती पवनी, सामाजिक कार्यकर्ते आसित बागडे, कैलास गेडाम ,प्रवीण थुलकर, सुदेश वैद्य, इंजिनिअर रूपचंद रामटेके, भदंत धम्मशिखर, जिल्हा परिषद सदस्य मोहन पंचभाई, ज्ञानेश्वर रक्षक गुरुकंज सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी धर्मदास भांबोरे ,भीमराव वानखेडे, डॉ. बनसोड , प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे, इंडियन प्रफुल व असंख्य बौद्ध उपासक, उपासिका यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे संचालन एडवोकेट महेंद्र गोस्वामी यांनी केले

### चौथास्तंभ ..

बाळ कृष्ण जांभेकर
लोकशाही चौथास्तंभ
पहिल्या वर्तमानपत्रां
दर्पण जाहला आरंभ

पत्रकारिता महा वृक्ष
तेधवा फुटलेला कोंब
दिग्दर्शन मासिकरुपा
सु विचार अमृत कुंभ

लेखणी असे देखणी
सजले अक्षरांचेकुटुंब
अध्याय रचे कर्तृत्वाचे
अणूसमान शक्ती टिंब

पांडित्य त्यांचे अद्भूत
ज्ञानवर्षा भिजवे चिंब
प्रभुत्वअनेक भाषांचे
तरीही नाही तया दंभ

वाचस्पती बहुआयामी
रे भुरळ पाडतो कदंब
क्रुर रुढी अंध विश्वास
जाळूनि टाकला सुंभ

पत्रकारिता हो निरोगी
दर्पणकार ते कडुनिंब
अल्पायुष्य जरी मिळे
रे कार्य इमले गगनचुंब

पत्रकारिताव्रतस्विकारे
पाहून आपले प्रतिबिंब
डागळूनका पावनकार्य
उजळावे सत्य अहर्बिंब

- हेमंत मुसरीफ पुणे.

# काळाची ३६ पाने उलटली पण मैत्रीचा सुगंध तसाच राहिला

## बीए ८९-९० शिलेदाराने पुन्हा गाजवले पेण कॉलेज

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर/उरण प्रतिनिधी :** वेळ वेगाने पुढे निघून जाते पण काळजाच्या एका कोपऱ्यात महाविद्यालयाच्या कट्ट्यावरचा तो मैत्रीचा सुगंध आजही तसाच दरवळत असतो. तब्बल साडेतीन दशकांपूर्वी ज्यांनी कला व वाणिज्य महाविद्यालय पेण इथे एकत्र स्वप्ने पाहिली आणि आयुष्याचे नवीन क्षितिज शोधले ते बीए ८९-९० च्या बॅचचा स्नेहमेळावा दिनांक ४ जानेवारी रोजी ज्ञाना फार्म हाऊस पिंपळगाव पेण येथे संपन्न झाला. हा केवळ कार्यक्रम नव्हता तर काळाच्या स्मृतीत विरून गेलेल्या निखळ मैत्रीचा पुन्हा एकदा झालेला हृदयस्पर्शी उदय होता.

या मंगलमय या सोहळ्याची सुरुवात श्री गणेश पूजनाने झाली. मात्र पूजन करतांना बाप्पा सोबतच समोर बसलेला प्रत्येक मित्र-मैत्रिणीच्या रूपात मैत्रीचे दैवत साऱ्यांच्या डोळ्यांमध्ये दिसत होते. त्यानंतर वर्षभरात ज्यांनी ज्यांनी स्वतःच्या कष्टाने विविध क्षेत्रात यशाची शिखरे पादाक्रांत केली, तसेच सेवानिवृत्त झालेल्यांचा आणि त्यांच्या लेकरांच्या यशाचा सन्मान करण्यात आला. आपल्या मित्राचे यश स्वतःचे यश म्हणून प्रत्येक टाळीत एक वेगळाच अभिमान जाणवत होता.



प्रत्येक मित्र-मैत्रिणीने आपली मनोगते व्यक्त केली .कोणी आपल्या संघर्षाची गोष्ट सांगितली. तर कुणी कॉलेजमधील ते निरागस प्रेम आणि मैत्रीच्या आठवणींना उजाळा दिला.तर कुणी आपले अबोल प्रेम काव्यातून व्यक्त केले.बोलता बोलता अनेकांचे कंठ दाटून आले. आणि डोळ्यातून निघणाऱ्या आनंदाश्रू ने मैत्रीचा सोहळा अधिकच पावन झाला .जेव्हा सर्वांनी मिळून मैत्रीचा केक कापला तेव्हा अजून ३६ वर्षाचे अंतर एका क्षणात पुसले गेले . स्नेहभोजन आणि फोटोसेशन दरम्यान रंगलेले हितगुज मैत्रीचे बंध अधिक घट्ट करून गेले.

भाऊक वातावरणात पुन्हा एकदा हास्याचे रंग भरले ते एकमेकांच्या खोड्या काढताना "अरे तू अजूनही तसाच आहेस" तुला चिडवल्याशिवाय आमचा दिवस जायचा नाही. अशा खोट्या खोट्या फिरवा फिरविने पुन्हा एकदा ते जुने दिवस अवतरले. गाण्यांच्या भेंड्यानी तर मैफीलीत जीव ओतला .प्रत्येकाने आपल्या तरुणपणातील ती आवडती गाणी गात. पुन्हा एकदा कॉलेजचे ते दिवस मनातल्या मनात जगले.

दिवस मावळला सूर्य क्षितिजाआड गेला पण या मित्रांच्या काळजातील आठवणींचा सूर्य मात्र अधिकच लख्ख झाला होता. एकमेकांचा निरोप घेताना पाय पुढे पडत नव्हते ,आणि हात सुटायला तयार नव्हते. चेहऱ्यावर हास्य होते. पण काळजात निरोपाची हुरहुर होती. एकमेकांना" पुन्हा लवकर भेटूया "हा शब्द देऊन जड अंतकरणाने ३६ वर्षांपूर्वी जे कॉलेज सुटले होते ते आज पुन्हा एकदा सुटल्याची हुरहुर प्रत्येकाच्या मनात लागून राहिली होती .पण सोबत होती ती पुन्हा एकदा नव्याने जोडलेल्या रेशमी मैत्रीच्या नात्याची ती विण, पुन्हा भेटण्याची ती ओढ ...अन् क्षणात एकमेकांची पाठ फिरली तसे संसार यात्रेतील गर्दीत पुन्हा सगळे हरवले. कोणताही सोहळा केवळ रंगमंचावर दिसणाऱ्या झगमगाटामध्ये पुर्ण होत नाही तर त्यामागे राबणाऱ्या हातांची मेहनत असते. हे स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी आयोजक मित्र मैत्रिणींनी घेतलेल मेहनत, तसेच मित्र-मैत्रिणींचा याच अतूट एकोप्यामुळे हा सोहळा फक्त यशस्वी झाला नाही तर ,उपस्थित मित्र मैत्रीणींच्या काळजात घर करून गेला.



**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर) : सद्गुरु श्री श्री साखर कारखाना लि. श्री श्रीनगर राजेवाडी या ठिकाणी चेअरमन एन शेषागिरी रावसर यांच्या उपस्थितीत दि आर्ट ऑफ लिविंग टीचर व संचालिका सौ. उषाताई मारकड यांनी चेअरमन बिल्डिंग या ठिकाणी गुरु पूजेचे आयोजन केले होते. यावेळी विधीवत पूजा व सद्गुरु श्री श्री रविशंकरजी तथा गुरुजी यांच्या फोटोचे पूजन करून धार्मिक विधीने गुरु पूजा पार पाडली. यावेळी अनेक साधक उपस्थित होते.**

# मंडलिकवस्ती च्या शाळेला माझी सुंदर शाळा 2023-24 चा...पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा पुरस्काराने मंडलिक वस्ती शाळेस सन्मानित करण्यात आले

3 जानेवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जन्मदिना निमित्त इंदापूर येथे पार पडलेल्या गुणवंत शिक्षक पुरस्काराच्या निमित्ताने महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री नामदार श्री दत्तामामा भरणे यांच्या हस्ते जिल्हा परिषद मंडलिकवस्ती शाळेस मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा एक सन 2023 - 24 तालुकास्तर प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले असून शाळेला तीन लाखाचे बक्षीस देखील मिळाले आहे.तसेच शाळेतील श्री आप्पासाहेब घोळवे आणि आणि सौ अश्विनी साळुंखे या दोघाही शिक्षकांना गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.पुणे जिल्ह्यामध्ये नावलौकिक असलेली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मंडलिकवस्तीने आपल्या गुणवत्तेचा आलेख सतत उंचावत ठेवला असून शाळेमध्ये प्रवेशासाठी विद्यार्थी यादी वेटिंग ला असते.




शाळेच्या विकासामध्ये सर्व विद्यार्थी मुख्याध्यापक व शिक्षक,पालक व ग्रामस्थ या सर्वांचा मोलाचा वाटा आहे.इंदापूर तालुक्याचे माननीय गटविकास अधिकारी श्री सचिन खुडे,माजी गटशिक्षणाधिकारी श्री अजिंक्य खरात तसेच गटशिक्षणाधिकारी श्री निलेश गवळी कुरवली केंद्राचे केंद्रप्रमुख मनोहर सांगळे यांचे देखील शाळेला वेळोवेळी मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.याप्रसंगी शाळेच्या माजी मुख्याध्यापिका सौ माधवी शेटे उपशिक्षक चंद्रकांत बनकर, प्रमिला घोळवे,शाळा व्यवस्थापन समितीच्या माजी अध्यक्षा वर्षा मोरे,कल्याणी मोरे नवनियुक्त मुख्याध्यापिका संगीता पांढरे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रशांत राऊत हे उपस्थित होते

# शिवसेनेला विश्वासात घेतल्याशिवाय ! कोणाचाच महापौर होणार नाहीः उदय सामंत

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** केंद्रात, राज्यात सत्तेत एकत्र असल्याने भाजपसोबत युती करण्यासाठी प्रचंड मेहनत केली. शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न केले. परंतु, ठीक आहे. त्यांनी गाफील ठेवले. युती केली नाही. शेवटच्या तासाभरात शिवसेनेला ताकदीचे 61 उमेदवार मिळतील का असे त्यांना वाटले नसेल. पण, शिवसेनेला ताकदीचे उमेदवार मिळाले. त्यामुळे शिवसेनेला विश्वासात घेतल्याशिवाय कोणाचाच महापौर होऊ शकत नाही, असा विश्वास शिवसेना नेते, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज व्यक्त केला. प्रचारात टीका-टिप्पणी करण्यापेक्षा आपण काय कामे करणार आहोत. हे जनतेला सांगावे, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी शिवसेना उपनेते, खासदार श्रीरंग बारणे, शिवसेनेचे उपनेते इरफान सय्यद, सुलभा उबाळे, महानगरप्रमुख राजेश वाबळे, जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर, शहरप्रमुख नीलेश तरस, युवा सेनेचे पश्चिम महाराष्ट्राचे सचिव विश्वजीत बारणे, बाळासाहेब वाल्हेकर, राजेंद्र तरस, जिल्हा संघटिका शिला भोंडवे उपस्थित होते.

उद्योगमंत्री उदय सामंत पुढे म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली विरोधकांना भुईसपाट केले जाईल. अनेक उमेदवार नवीन आहेत. या उमेदवारांनी मतदारांच्या विश्वासाला पात्र ठरावे. समोरच्यावर टीका करु नये, कोणाची उणीदुणी काढू नये. आपण किती चांगले काम करणार आहोत, हे सांगावे. जनता टिका-टिप्पणीला कंटाळली आहे. कोणावरच टीका करायची नाही. टीका केल्याने मते वाढत नाहीत. नम्रतेने लोकांसमोर जावे. पिंपरी-चिंचवडसाठी एकनाथ शिंदे यांचे मोठे योगदान आहे. शास्तीकर माफ करण्याचा निर्णय एकनाथ शिंदे यांनी केला. त्यामुळे त्याचे श्रेय कोणी घेऊ नये.

असे सांगून ते पुढे म्हणाले शिवसेनेचे बरचेसे काम उपमुख्यमंत्री अजित पवार हलके करत आहेत. त्यामुळे चिंता करण्याचे काही कारण नाही. फक्त अजित पवार जे म्हणतील त्याला मम म्हणत



जाऊ, आपण काही विकास कामे करणार आहोत, हे जनतेला सांगावे. शिवशक्ती विरुद्ध धनशक्तीची लढाई आहे. समोर धनाढ्य लोक आहेत. आपल्याकडे संघर्ष करणारा शिवसैनिक आहे. संघर्ष करणारा शिवसैनिक धनशक्तीला भुईसपाट करुन जिंकल्याचा इतिहास आहे. नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना महाराष्ट्राचा दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला. शिवसेनेच्या विश्वासघाताची ही निवडणूक आहे. समोरच्यांच्या भ्रष्टाचाराची आहे. त्यांच्या कारभाराला चपराक देणारी निवडणूक आहे. संघर्षशिवाय काहीच मिळत नाही. त्यामुळे शिवसेनेच्या उमेदवारांच्या नशिबी संघर्ष आला आहे. स्वबळावर लढत असलो, तरी एकनाथ शिंदे यांची पूर्ण ताकद सर्व उमेदवारांच्या पाठिशी आहे. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना आणली आणि राबविली. पृथ्वी तलावर जोपर्यंत चंद्र आणि सुर्य आहे, तोपर्यंत ही योजना बंद होऊ शकणार नाही. आपण आपल्याला कमकवूत समजायचे नाही. समोरच्याला कमकूवत समजावे. आपले बरेचसे काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पूर्ण करणार आहे. आपल्याला फक्त लोकांपर्यंत पोहचावे. घरोघरी जाऊन प्रचार करावा. शेवटच्या तीन दिवसात दबाव, दादागिरीचे राजकारण केले जाऊ शकते. या सगळ्या गोष्टीसमोर छातीठोकपणे उभे रहावे. ज्यांना स्वत:च्या अस्तित्वाची पडली आहे, ते पत्रकार परिषद घेतात. टीका-टिप्पणी करतात. हा भानगडीत आपल्याला पडायचे नाही. आपण सोबत असतो, तर काही लोकांची ढाल बनलो असतो. पण, त्यांना आपण नकोच आहेत. त्यामुळे लाचारी करायची देखील काही गरज नव्हती. शिवसैनिकांना न्याय देण्याचा निर्णय घेतला असल्याचे सामंतयांनी शेवटी सांगितले.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, शिवसेना 60 जागांवर निवडणूक लढवत आहे. भाजप-शिवसेनेची युती व्हावी यासाठी सर्वजण आग्रही होते. परंतु, युती झाली नाही. शेवटच्या दोन तासात उमेदवार उभे केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कार्यकर्त्यांना बळ देतात. शहरातील भ्रष्टाचाराविरोधात लढाई आहे. शहरात पाणी समस्या आहे. मुळशी धरणातून पाच टीएमसी पाणी आणले जाईल. पवना, इंद्रायणी नदी स्वच्छ करायची आहे. प्रदुषण नियंत्रणात आणायचे आहे. नगरविकास खाते एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे. प्राधिकरण बाधित शेतकऱ्यांना 40 वर्षे कोणी परतावा दिला नाही. हा परतावा एकनाथ शिंदे यांनी दिला. परताव्याचा नावाने लोकांकडून मते घेतली जात होती. पण, निर्णय घेण्याचे धाडस शिंदे यांनी केले. शास्तीकराचे 650 कोटी माफ केले. नागरिकांना अशुद्ध पाणी मिळत आहे. पवना बंदिस्त जलवाहिनी योजनेवर दोन निवडणुका झाल्या. पण, काम झाले नाही. टीका-टिप्पणी करुन काम करायचे नाही. सात माजी नगरसेवक पक्षासोबत जोडले आहेत. किवळेतील संपूर्ण पॅनेल निवडून येईल.

## नवीमुंबईच्या पाणी टंचाईवर सिडकोचा तोडगा !
### पेणच्या हेटवणे धरणातून जलबोगद्या व्दारे पाणी थेट उपनगरात

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** राज्यसरकारने मुंबईला पर्याय म्हणून नवी मुंबईची निर्मिती करण्याची संकल्पना तयार करून या करिता शहर आणि औद्योगिक विकास महामंडळलाची (सिडको) स्थपना1970 साली केली यानंतर गेल्या 55 वर्षात या नंतर सिडकोने अवकाशात गरुड झेप घेत अनेक उपनगरांची (नोड) ची निर्मिती केली,उपनगरे विकसित होत गेल्याने लोकवस्ती बरोबरच औद्योगिक वसाहतीही वाढत गेल्या अनेक प्रकल्प विकसित होत गेले,त्यामुळे पाण्याची गरज वाढत गेली पाणी टंचाई भासू लागली,यावर मात करण्या साठी सिडकोने अभिनव योजना तयार केली असून या योजने अंतर्गत सिडकोने पेण येथील हेटवणे धरणा पासून जलबोगदा तयार करण्याच संकल्प केला आणि तो प्रत्यक्षात उतरविला आहे.

वाढती उपनगरे त्यानुळे सातत्याने वाढत जाणारी लोकवस्ती वाढत्या औद्योगिक



वसाहती त्यामुळे पाण्याची गरज वाढत गेली पाणी टंचाई भासू लागली,यावर मत करण्या साठी सिडकोने नवी मुंबईत पाणी पुरवठा करण्या साठी पेण-हेटवणे धरणा पासून जलबोगदा तयार करण्याच संकल्प केला आणि तो प्रत्यक्षात उतरविला आहे. हा बोगदा हेटवणे धरणा पासून जिते येथील जलशुद्धीकरण केंद्र पर्यंत कच्च्यापाण्याचा बोगदा असून त्यची लांबी सुमारे.13.25 कि.मी.इतकी असणार आहे.तर प्रक्रिया केलेल्या पाण्या साठी 15.4 किमी लांबीचा बोगदा तयार करण्यात आला आहे.त्या मुळे सिडकोच्या पाणी पुरवठा क्षमते मध्ये सुमारे 120 MLD वरून 270 MLD इतकी वाढणार आहे.टेनल बोरिंग मशिन वापरून हे काम सुरु आहे. या बोगद्याच्या पहिल्या टप्प्यातील साडेपाच किमीचा पहिला जलबोगदा वहाळ येथील जलशुद्धीकरण केंद्र पर्यंत सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक. विजय सिंधल यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख,ॲफकॉन्स इन्फास्ट्रक्चर ली.चे कार्यकारी अध्यक्ष कृष्णमूर्ती सुब्रमण्याम,सिडकोच्या मुख्य अभियंता शीला करुणाकरण,व अन्य अधिकारी उपस्थितीत होते.बोगद्याचा अतिं सव्वा मीटरचा भाग वरील मान्यवरां समोर टीबिएम यंत्राने खोदून आरपार केल्या नंतर फटके वाजवून टाळ्यांच्या गजरात जल्लोष केला.सर्व प्रकारच्या अभियांत्रीक आव्हांवर मात करून जलबोगद्याचे काम यशस्वीपणे झाल्या मुळे 2028 पर्यंत सिडकोच्या उपनगरांची तहान भागेल. या प्रकल्प सठी सुमारे 2400 कोटीच खर्च होणार आहे.

## एम क्योर फार्मासिटिकल च्या सहकार्याने नागपूर येथे हायपर टेन्शन कॉनफ्लेव्ह नावाचा शैक्षणिक कार्यक्रम आयोजित

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :** महाराष्ट्र असोसिएशन ऑफ फिजिशियन्स (MAP) ने, एमक्योर फार्मास्युटिकल्सच्या सहकार्याने, रविवार, ४ जानेवारी २०२६ रोजी, हॉटेल सेंटर पॉइंट, रामदासपेठ, नागपूर येथे “हायपरटेन्शन कॉन्क्लेव्ह” नावाचा एक सर्वसमावेशक शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केला.

या परिषदेची सुरुवात सकाळी ९.०० वाजता झाली आणि यामध्ये संपूर्ण विभागातील डॉक्टरांनी उत्साहाने सहभाग घेतला. या वैज्ञानिक कार्यक्रमात उच्च रक्तदाबाच्या निदानातील आणि व्यवस्थापनातील समकालीन आव्हाने आणि प्रगतीवर लक्ष केंद्रित करण्यात आले होते, ज्यात त्याचे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी, मूत्रपिंड आणि चयापचयविषयक परिणामांवर विशेष भर देण्यात आला होता.

शैक्षणिक सत्रांमध्ये क्लिनिकल केस सादरीकरणे, उच्च रक्तदाबामध्ये





कृत्रिम बुद्धिमत्ता, प्राथमिक आणि दुय्यम उच्च रक्तदाब, प्रतिरोधक उच्च रक्तदाब, क्लिनिकल प्रॅक्टिसमधील कायराल उपचारपद्धती, मूत्रपिंडाच्या आजारासह उच्च रक्तदाब, उच्च रक्तदाबातील अलीकडील प्रगती आणि उच्च रक्तदाब व मधुमेह यांच्यातील परस्परसंबंध या विषयांचा समावेश होता. उच्च रक्तदाबावरील प्रश्नमंजुषीने कार्यक्रमात संवादात्मक मूल्य वाढवले.

डॉ. आर. बी. कलमकर, डॉ. श्रीराम कुलकर्णी, डॉ. जय देशमुख, डॉ. शरद देशमुख, डॉ. निर्मल जयस्वाल, डॉ. अभिजीत रॉयचौधरी, डॉ. जितेश जेसवानी, डॉ. अभिषेक खोब्रागडे, डॉ. प्रमोद गांधी आणि डॉ. शंकर खोब्रागडे यांसारख्या नामांकित प्राध्यापकांनी आपले ज्ञान आणि अनुभव सामायिक केले. नागपूर आणि आसपासच्या भागांतील ज्येष्ठ डॉक्टरांनी सत्रांचे अध्यक्षस्थान भूषवले, ज्यामुळे समृद्ध शैक्षणिक चर्चा झाली.


एमएपीचे अध्यक्ष डॉ. श्रीराम कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे मार्गदर्शन केले, तर एमएपीचे उपाध्यक्ष डॉ. शंकर खोब्रागडे यांनी परिषदेच्या आयोजन आणि समन्वयामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

एमएपीच्या सरचिटणीस डॉ. अंजली राजाध्यक्ष यांनी संघटनात्मक सहकार्य केले.हायपरटेन्शन कॉन्क्लेव्हला त्याच्या व्यावहारिक दृष्टिकोन आणि शैक्षणिक खोलीसाठी प्रतिनिधींकडून खूप प्रशंसा मिळाली, ज्यामुळे दैनंदिन वैद्यकीय सरावामध्ये उच्च रक्तदाबाच्या अद्ययावत, पुराव्यावर आधारित व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित झाले.

## अंध कलाकारांच्या सुरांनी महागावकरांची मने जिंकली

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे/महागाव (यवतमाळ) :** महागाव येथे अंध कलाकारांनी सादर केलेल्या सांगीतिक कार्यक्रमाने रसिक प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले. या कलाकारांनी भक्तीगीते, देशभक्तीपर गीते तसेच भीमगीते सादर करत उपस्थितांना एक वेगळाच अनुभव दिला.दृष्टी नसली तरी आत्मविश्वास, जिद्द आणि संगीतावर असलेले प्रभुत्व याच्या जोरावर या कलाकारांनी आपल्या सुरेल गायनाने कार्यक्रमाला वेगळीच उंची दिली. प्रत्येक गीतातून भावनांचा ओघ वाहत होता आणि रसिकांनी टाळ्यांच्या गजरात कलाकारांचे भरभरून कौतुक केले.कार्यक्रमादरम्यान सादर करण्यात आलेल्या भक्तीगीतांनी वातावरण भक्तिमय झाले, तर देशभक्तीपर गीतांनी





उपस्थितांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत केली. भीमगीतांच्या सादरीकरणाने सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला.हा प्रेरणादायी आणि समाजाला सकारात्मक संदेश देणारा कार्यक्रम रेणुका दिव्यांग संघ, सुर संगीताचा कलामंच, पुसद यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला महागाव व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.

## वर्धा येथे राष्ट्रीय खैरे कुणबी समाज संघटनेची विचार मंथन बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक**

**नागपूर विभाग :** राष्ट्रीय खैरे कुणबी समाज संघटने च्यावतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीचे औचित्य साधून विचार मंथन बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत खैरे कुणबी समाजातील आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक तसेच बेरोजगार तरुणांच्या समस्यांवर विस्तृतपणे चर्चा करण्यात आली. या समस्यांवर संघटनेच्या वतीने प्रयत्न करण्यात येईल. असे संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गुणेश्वरजी आरिकर यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाबाराव भोयर यांनी केले, त्यांनी संघटनेच्या मंथन बैठकीच्या उद्देशाची तसेच संघटने च्यावतीने करण्यात येणाऱ्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गुणेश्वर आरिकर हे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खैरे कुणबी रणरागिणी मंचच्या अध्यक्षा संगीताताई बढे होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज,





क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले तसेच मॉ जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. बैठकीत विविध जिल्ह्यांतून आलेल्या समाजबांधवांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला प्रमोदराव भोमले, रामदास बाकरे, दिवाकर तिजारे, प्रकाश भोयर, कपिल थुटे, अरविंदराव बोटफोले, आशिष व्यापारी, कविश्वर खडसे रामटेक, पुस्ताराम भोयर रामटेक, विलास दाबडदुबके रामटेक, राधेश्याम चौधरी रामटेक, विनोद सातपुते हिंगणघाट, चंद्रकांत ससाणे पुलगाव, इ. उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी बाबाराव भोयर, महादेवराव तांगडे, दिवाकर कोरेकार, राजेंद्र अनफाट, प्रमोदराव भोमले, संगिताताई बढे, दामोदरराव मुडे, प्रकाशराव भोयर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन चंद्रशेखर ठाकरे यांनी तर प्रास्ताविक आणि आभार बाबाराव भोयर यांनी केले.

## रक्षा लेखा विभागाच्या सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचार्यांचे स्नेह सम्मेलन मोठ्या उत्साहात

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक**

**नागपूर विभाग :** नागपुर व जवळील परिसरात राहणाऱ्या रक्षा लेखा विभागाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सहकुटुंबातील स्नेह सम्मेलन आयोजित करण्यात आले होते. कर्यक्रमाचा शुभारंभ सर्वात वयोवृद्ध सेवानिवृत्त डी एन जोशी यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. याप्रसंगी प्रमोद खिरे, सेवानिवृत्त सहायक निदेशक





(रा.भा) यांनी प्रस्तावना मांडली व आयोजनाचे उद्दिष्ट्येबद्दल सांगितले. लक्ष्मण लिखार, सेवानिवृत्त रक्षा लेखा संयुक्त नियंत्रक, यांनी आयोजन बद्दल समाधान व्यक्त केले, ते म्हणाले कि असे आयोजन झाल्याने एकमेकांच्या भेटी होतात व एकटेपणा ची भावना दूर होते. सेवानिवृत्त सदस्यांच्या सुविधेसाठी जीवन प्रमाण एप डाऊनलोड करून जीवन प्रमाणपत्र प्रस्तुत करण्याचे प्रात्यक्षिक करण्यात आले. यामुळे कार्यालयात व बैंकेत न जाता मोबाईल द्वारे ही प्रक्रिया सहज करता येते. अन्य उपलब्ध सेवांची पण माहीती देण्यात आली. ७५ वर्ष झालेल्या सदस्यांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आले. इतरही सर्व सदस्यांना दुपट्टे देऊन सत्कार केले. भारतीय रक्षा लेखा सेवेचे सेवानिवृत्त अधिकारी एस.टी.रणदिवे, आनंद मेश्राम, एन.जी.चोखंदरे, बी.जी.थूल, बी.एम.हकीम, विनायक वर्तक, विकास मोहरीर व इतरही अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. अशोक पझारे, किशन भिमटे, गेंदलाल गणवीर, पी.एम.देव, दिलिप बागेश्वर यांचे सहकार्य लाभले. जितेंद्र थुलकर यांनी संचालन केले तर सुधीर बरडे यांनी आभार मानले.

## नाशिकच्या मेळाव्यात वाशिमच्या युवकांचे रक्तदान

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** महाराष्ट्र मोबाईल टॉवर तांत्रिक कामगार संघटना यांच्या वतीने नाशिक येथे दि. २ जानेवारी रोजी आयोजित अधिवेशनात वाशिम जिल्ह्यातील युवकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठेवला.नाशिक येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात महाराष्ट्र टेलिकॉम कामगार संघटनाचे अध्यक्ष देवा माने (मुंबई) तसेच आपली एकता कामगार संघटनाचे उपाध्यक्ष अजित पवार पांडे (वसई) उपस्थित होते. अधिवेशनाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र मोबाईल टॉवर तांत्रिक कामगार संघटनेचे जनक शिवाजी रावसाहेब शिंदे यांनी भूषविले.

या अधिवेशनात रितेश देशमुख, अमित देशमुख, गणेश कुरंगळ, महादेव आमटे, सुनील जाधव, समीर





खान, नारायण जाधव, आरिफ भाई, इसरार खान, सुरेश जाधव, सुरेश काळबांडे, अमोल पुरी घुगे, शिवाजी शिंदे, बालाजी जाधव यांच्यासह एकूण ४० युवकांनी रक्तदान केले.यावेळी अधिवेशनात ठराव घेण्यात आला की, महाराष्ट्र मोबाईल टॉवर तांत्रिक कामगार संघटनेच्या कर्मचाऱ्यांना स्वाभिमानाने जगता यावे यासाठी त्यांच्यासाठी स्वतंत्र कायदा करून त्यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे, अशी मागणी राज्य सरकारकडे करण्यात यावी.

मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक
# युवक आधार
मराठी




■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : ११९ ■ मंगळवार, ०६ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

